शनिवार, ८ एप्रिल २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२१६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SATURDAY 8 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-215 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-5

# येत्या ४८ तासांत राज्यात मुसळधार पावसाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** ऐन उन्हाळ्यात सर्वत्र अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. यातच पुन्हा आता हवामान खात्याकडून राज्याला अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. येत्या ४८ तासांत गडगडाटी वादळ, विजांचा कडकडाट, वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार विदर्भातील बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, अमरावती, अकोला, नागपूर, गोंदिया, वर्धा जिल्ह्यात पावसाची शक्यता असून, पुढचे २४ तास मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, दक्षिण कोकण, गोवा, पश्चिम किनारपट्टी, उत्तर कर्नाटक आणि उत्तरप्रदेशातील काही भागांवर मेघगर्जनेसह पावसाच्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पश्चिम विदर्भात गारपिटीची शक्यता वर्तवण्यात आली असून, अनेक शहरांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर राज्यातील नांदेड, लातूर, उस्मानाबाद, मुंबई, ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार या शहरांमध्येही पावसाची शक्यता आहे. प्रादेशिक हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, अकोला जिल्ह्यात शनिवार, आठ एप्रिलपर्यंत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून वादळी वाऱ्याचा इशारा देण्यात आला आहे. सात आणि आठ एप्रिलला विदर्भातील सर्वच जिल्ह्यांत काही ठिकाणी विखुरलेल्या स्वरुपात गडगडाटासह पावसाची शक्यता आहे. शुक्रवारी पश्चिम विदर्भात, तर शनिवारी पूर्व विदर्भात पावसाचे प्रमाण जास्त राहण्याची शक्यता आहे.





# अमिषा पटेल विरुद्ध वॉरंट जारी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अभिनेत्री अमिषा पटेल अडचणीत सापडली आहे. तिच्याविरोधात न्यायालयाने वॉरंट जारी केले आहे. झारखंडमधील रांची दिवाणी न्यायालयाने अमिषा पटेल आणि तिचा व्यावसायिक भागीदार कृणाल यांच्याविरुद्ध फसवणूक आणि चेक बाऊन्स प्रकरणात वॉरंट जारी केले आहे. अरगोरा येथील रहिवासी अजय कुमार सिंह यांनी २०१८ मध्ये अभिनेत्रीवर गुन्हा दाखल केला होता. तक्रारीतील आरोपानुसार, अमिषा पटेलने चित्रपट बनवण्याच्या नावाखाली त्यांच्याकडून अडीच कोटी रुपये घेतले होते, पण हा चित्रपट बनू शकला नाही आणि अमिषाने पैसेही परत केले नाहीत.

अजय कुमार यांच्या म्हणण्यानुसार, अमिषा पटेल आणि तिचा भागीदार कृणालने चित्रपट पूर्ण झाल्यानंतर व्याजासह पैसे परत करणार असल्याचे सांगितले होते. 'देसी मॅजिक' नावाच्या चित्रपटाचे शूटिंग २०१३ मध्ये सुरू झाले होते. मात्र, हा चित्रपट अद्याप प्रदर्शित झालेला नाही. तसेच चित्रपट निर्मात्याने अमिषा पटेलकडे पैसे मागितल्यावर तिने परत केले नाहीत. नंतर तिने ऑक्टोबर २०१८ मध्ये त्याला २.५ कोटी आणि ५० लाख रुपयांचे दोन चेक दिले होते, पण ते बाऊन्स झाले होते. या प्रकरणी रांचीच्या दिवाणी न्यायालयाने वॉरंट जारी केले आहे. अमिषाला समन्स बजावण्यात आले होते, पण तरीही ती कोर्टात हजर राहत नाही, तसेच ती तिचा वकीलही पाठवत नाही. अशा स्थितीत हे वॉरंट जारी करण्यात आले आहे. पुढील सुनावणी १५ एप्रिल रोजी होणार आहे.

# सतर्कतेचा इशारा !

## कोरोनाबाधितांच्या संख्येत मोठी वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : मागील काही दिवसांपासून देशभरात कोरोनाबाधितांच्या संख्येत मोठी वाढ होत असताना आज केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडविया यांनी सर्व राज्यांच्या आरोग्यमंत्र्यांसोबत बैठक घेतली. कोरोनाबाधितांची संख्या वाढत असल्याने अधिक सतर्क राहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी म्हटले. कोरोना चाचणी आणि जीनोम सिक्वेंसिंगसह कोरोना नियमांचे पालन करण्यावर या बैठकीत चर्चा झाली.**

केंद्रीय आरोग्यमंत्री मांडविया यांनी सांगितले की, आपल्याला अधिक काळजी घ्यावी लागणार असून सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. लोकांमध्ये अनावश्यकपणे भीतीचे वातावरण निर्माण होऊ नये याची काळजी घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी म्हटले. राज्यातील कोरोनाची स्थिती पाहता आरोग्य सुविधा, पायाभूत सुविधांचा आढावा घेण्याचे निर्देश त्यांनी सर्व राज्यांच्या आरोग्यमंत्र्यांना दिले. त्याशिवाय राज्यांतील आरोग्य मंत्र्यांनी रुग्णालयांचा दौरा करावा, अशी सूचनाही त्यांनी केली. देशभरात 10 आणि 11 एप्रिल रोजी संपूर्ण देशात मॉक ड्रिल करण्यात येणार आहे. बैठकीच्या दरम्यान कोरोनाबाधितांची वाढती संख्या लक्षात घेता राज्य सरकारांनी आपल्या पातळीवर कोरोना महासाथीचा सामना करण्यासाठी योग्य तयारी करण्याचेही सूचना केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी दिली. लोकांना अधिक जागरूक करण्याची आवश्यकता असून त्यात कोणताही हलगर्जीपणा करता कामा नये, असेही त्यांनी म्हटले. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या 6 एप्रिलच्या कोरोना



प्रकरणांच्या अहवालानुसार, गेल्या 24 तासांत देशात कोरोनाचे 5,335 रुग्ण आढळले आहेत. हा आकडा गेल्या 195 दिवसांतील उच्चांक आहे. यापूर्वी, गेल्या वर्षी 23 सप्टेंबर रोजी 5,383 प्रकरणे नोंदवली गेली होती. यासह, देशातील सक्रिय प्रकरणांची संख्या 25,587 झाली आहे. गेल्या 24 तासांत कोरोना व्हायरसमुळे 14 रुग्णांचा मृत्यू झाला आहे. यासह, कोरोना व्हायरसमुळे मृत्यू झालेल्यांची देशातील एकूण संख्या 5 लाख 30 हजार 943 वर पोहोचली आहे. शुक्रवारी जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार, देशात आतापर्यंत एकूण 4 कोटी 41 लाख 85 हजार 858 रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत.



अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातील कोथळी खुर्द गावात गुरुवारी हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त मुंगसाजी महाराज संस्थानच्या वतीने वानरांना मिष्टान्नाची पंगत देण्यात आली होती. माकडांनीही अगदी शिस्तीत पंगतीचा आस्वाद घेत मिष्टान्नांवर ताव मारलाय.

# हिरकणी कक्ष नसल्याने स्तनदा मातांची होते कुचुंबना

## सुविधाचा अभाव : बसस्थानकात पिण्यासाठी पाणीही उपलब्ध नाही


आधुनिक केसरी न्यूज

बि. डी. रामपूरकर

जिंतूर : सार्वजनिक ठिकाणी तसेच प्रवासात महिलांना आपल्या तान्हुल्यांनास स्तनपान करण्यासाठी वेगळी जागा मिळत नाही. अशावेळी बाळ भुकेने व्याकूळ होतात हे ओळखून ब्रेस्ट फिडिंग प्रमोशन नेटवर्क कौन्सिलिंग यांच्या सूचनेवरून काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील बस स्थानकात हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आला स्तनदा मातांसाठी सुरू केलेला हिरकणी कक्ष एस टी महामंडळांकडून काहीही प्रयत्न केले जात नसल्याचे दिसते. जिंतूर येथील बस स्थानकात हिरकणी कक्ष अद्यापही उघडलेला दिसत दिसून येत नाही. येथील बसस्थानकात मोठ्या प्रमाणात प्रवाशांची रेलचेल असते त्यामुळे त्यात अनेक महिला आपल्या तान्हुल्याला स्तनपान करण्यासाठी त्यांच्या मातांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे कारण या ठिकाणी गेल्या अनेक दिवसापासून बसस्तानकात स्वतंत्र असा हिरकणी कक्ष दिसून येत नाही. त्यामुळे स्तनपान पाजण्यासाठी उघड्यावरच कित्येक महिलांना आपल्या भुकेलेल्या बाळासाठी उघड्यावरच लपून स्तनपान करावे लागते. बस स्थानक सारख्या वर्दळीच्या ठिकाणी स्तनदा मातांना आपल्या तालुक्याला स्तनपान करण्यासाठी ओशाळल्यासारखे व्हायचे बाळाला सतनपान करताना त्यांची कुचुंबना होत असे, यावर तोडगा काढण्यासाठी हिरकणी कक्ष सुरू केले परंतु बस स्थानकात जनजागृती व सुविधाचा अभाव यामुळे महिलांची कुचंबना होत असताना दिसते. जिंतूर बस स्थानकात कंट्रोल ऑफिसच्या बाजूला हिरकणी कक्ष करणार असल्याचे आगारातील एका अधिकाऱ्यांनी सांगितले. यासाठी जनजागृती होणे गरजेचे असताना स्तनपान करण्यासाठी बसायला जागा नसल्यामुळे नीज नीज रे बाळा, करू नकोस रे तू चिंता, काळजी नाही रे तुझी या एसटीच्या अधिकाऱ्यांना अशी म्हणण्याची वेळ स्तनदा मातावर आली आहे. याकडे संबंधित प्रशासने लक्ष देण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.



जिंतूर बस स्थानकात प्रवाशांना अनेक गैरसोईना सामोरे जावे लागत असल्याने नुकतेच अखिल भारतीय ग्राहक पंचायत व प्रवाशी संघटनेकडून तसे तक्रार अर्ज ही देण्यात आला असला तरी सध्या मार्च महिना असल्यामुळे ऊन्ही कडाक्याचे तापत आहे त्यामुळे प्रवाशांना बस स्थानकात पिण्यासाठी पाणी नसल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होऊन कुचंबना होत आहे त्यासाठी नाईलाजाने प्रवाशांना तहान भागवण्यासाठी एसटी महामंडळाचे लेबल असलेली पाण्याची बाटली नाईलाजाने 20/ – रुपये या दराने खरेदी करावी लागत असल्याचे चित्र दिसून येते.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

विश्वामित्रांनी जशी आपल्या तपसामर्थ्याच्या बळावर प्रतिसृष्टी निर्माण केली, तशीच प्रतिसृष्टी या शिल्प आणि चित्रांच्या माध्यमातून येथील कलाकारांनी त्या काळी उभारली. ज्या राजांच्या काळात या लेण्यांची निर्मिती झाली, ते राजे कला आणि सौंदर्याचे किती उपासक असले पाहिजेत. त्या काळातील चित्रकला, शिल्पकला कळसाला पोहोचली होती, त्याचे मनोरम दर्शन या लेण्या घडवतात. त्यासाठी त्या काळातील राजांचे आणि कलाकारांचे हे मोठेच ऋण आपल्यावर आहे.
भगवान गौतम बुद्ध या सगळ्या चित्रांच्या केंद्रस्थानी आहेत. त्यांच्या जीवनातील महत्वाचे प्रसंग येथे चित्रित करण्यात आले आहेत. त्यांचा जन्म, गृहत्याग, बुद्धप्रलोभन किंवा मार नावाच्या राक्षसाने त्यांना साधना करण्यापासून परावृत्त करण्याचे केलेले प्रयत्न ज्यांना पाश्चात्य इतिहासकारांनी टेम्पटेशन ऑफ बुद्धा असे म्हटले आहे, भगवान बुद्ध एकाच वेळी हजार ठिकाणी प्रकट झाले तो म्हणजे श्रावस्तीचा चमत्कार, नीलगिरी नावाच्या उन्मत्त हत्तीचे दमन, गौतम बुद्धांची पत्नी यशोधरा आणि पुत्र राहुल आदी बुद्धांच्या जीवनातील प्रसंगांचे चित्रण येथे आढळते. अजिंठा लेण्यात बुद्धांच्या पूर्व जीवनातील जन्माच्या कथा मोठया प्रमाणावर आहेत. त्यांना जातक कथा असे म्हटले जाते. या पूर्वजन्मांमध्ये भगवान बुद्धांनी प्रज्ञा,शील, करुणा, धैर्य यासारख्या दहा गुणांमध्ये पारंगतता मिळविली. या पूर्व जन्मांमध्ये त्यांना बोधिसत्व असे म्हटले जाई. बोधिसत्व म्हणजे बुद्ध होण्याचे सत्व किंवा क्षमता ज्याच्यामध्ये आहे अशी व्यक्ती. अजिंठ्यातील लेण्यांची संख्या तीस असून त्यात बुद्धांच्या पूर्वजन्मातील एकूण ३६ जातक कथांची चित्रे आपल्याला आढळतात. बौद्ध धर्मातील आचार्यांनी पुढे बुद्ध साहित्याला अनेक प्रकारे समृद्ध केले. त्यातीलच एक महाकवी अश्वघोष. त्यांचे सौंदरनंद हे नाटक प्रसिद्ध आहे. त्यातील कथा अजिंठ्याच्या लेण्यात चित्रित झाली आहे. सुंदरी आणि नंद यांची ही कथा. नंद हा भगवान गौतमांचा सावत्र भाऊ. त्याने गौतम बुद्धांच्या उपदेशावरून संन्यास घेतला.



## आनंदी पहाट

## आज्ञेच्या दबावाखाली नेहमीच राहणे प्रगतीला मारक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

बालपणापासून आपल्या अंगवळणी पडलेल्या सवयीमुळे आपण अनेकदा आज्ञेच्या आधीन झालेले असतो. आज्ञेच्या अभावी आपण विचार, वर्तन अथवा व्यवहार ह्याबाबतीत काहीवेळा अनभिज्ञ असतो, अनावधानाने देखील काही करायला सुरुवात करतोच असे नाही. परंतू काहीवेळा आपल्याला आज्ञाच मिळत नाही. ही आज्ञा एखाद्या व्यक्तीकडूनच मिळावी लागते असे काही नाही, तर आपल्या ज्ञानेद्रीयांकडून जरी मिळाली तरी कार्यकृती सुरु होऊन त्यांतून आपल्या प्रकृतीचे आणि संस्कृतीचे दर्शन घडू शकते. अनेकांच्या बाबतीत ती आज्ञा कोणाकडूनच मिळत नाही, परंतू कृती मात्र होत राहते तेव्हा त्यांतून विकृतीचे प्रदर्शन होत जाते. इतर व्यक्तीकडून अथवा स्वतःच्या ज्ञानेद्रीयांकडून आज्ञा न मिळाल्यास आपल्यातील कृतीचा अभाव दिसू लागतो. त्याचा थेट परिणाम आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहार ह्यांच्यावर होताना आपल्याला दिसतो. आज्ञेच्या अभावाची खरेच आपल्याला जाणीव होत नसते का? आपले वैचारिक मंथन आज्ञेशिवाय होऊच शकत नाही का? आज्ञेचा अभाव जसा काहीवेळा तापदायक ठरत असतो, तसाच आज्ञेचा प्रभाव देखील त्रासदायक ठरू शकतो, ह्याचा अनुभव आपल्यापैकी प्रत्येकाने कमी-अधिक प्रमाणांत कधीना कधी घेतलाच असणार. असा अनुभव कदाचित शाळा-महाविद्यालयांत, नोकरी-व्यवसायांत, घरांत-धंद्यांत इतरत्र कोठेही आलेला असू शकतो. प्रत्येक ठिकाणी एखाद्या अधिकारप्राप्त व्यक्तीने आज्ञा दिल्याशिवाय कार्यकृती होत नाहीत. मी म्हणेन तीच पूर्व दिशा असे म्हणणारी व्यक्ती कितीही दिशाभूल करत असली तरीही त्या व्यक्तीच्या आज्ञेचा प्रभाव इतका असतो कि, त्याच्यापुढे कोणाचेच काही चालत नाही. काहीवेळा तर नसलेल्या अधिकाराचा सुद्धा गैरवापर करण्याची प्रवृत्ती ह्यामुळे बळावत जाते. आज्ञेच्या प्रभावाखाली आणि दबावाखाली दबलेल्या प्रत्येकास सांगितल्याप्रमाणे काम करावे लागते. अर्थात तो म्हणजे तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करण्यासारखेच असते.



आधुनिक केसरी

**चंद्रभागा नीर | लोचनात ||**
यादवांचे घरी | राम कृष्ण हरि ||
सूर दरबारी | गंधर्वाचे ||१||
पंचपदी दंग | झाले श्रोतेजन ||
वैष्णवांचे गाण | आनंदाचे ||२||
नादब्रह्म रूप | भजनाचा रंग ||
मनीचे तरंग | अमृताचे ||३||
शब्दांचे माधुर्य | साधनेचे फळ ||
अमृत रसाळ | ताल सूर ||४||
पंढरीच्या वाटे | भैरवीचे सूर ||
चंद्रभागा नीर | लोचनात ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

**चन्द्रहासं करे धृत्वा
चन्द्रहासं हि पाहि नु |
वञ्चकेभ्यश्च रक्ष त्वं
रक्ष मां रक्ष रेणुके || 6 ||
हाती चन्द्रहास म्हणजे खड्ग धारण करून या चन्द्रहासाचे रक्षण कर. हे रेणुके, तू माझे वंचकांपासून रक्षण कर. रक्षण कर. रक्षण कर.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



**स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज**

**वड़ा वड़ापन में रहे, छोट विघ्न कर भाव ।
विद्युत जार न सेन्धु को, बड़ कर यही स्वभाव
।।०८।।(स्वर्वेद तृतीय मण्डल दशम अध्याय) ०३/१०/०८
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
श्रेष्ठ पुरूष आपल्या मर्यादा पालनात सदैव एकसमान असतात आणि छोटे लोक आपल्या स्वभावानुसार दुसऱ्यांना कष्ट देण्यासाठी कार्यात अनेक अडथळे आणतात, तरीही श्रेष्ठ पुरूष त्यांना क्षमा करून आपल्या धर्म-मर्यादेचं पालन करतात. जशी वीज समुद्राला जाळू शकत नाही त्याचप्रमाणे श्रेष्ठ पुरूष अनेक विघ्नं आल्यावरही आपला स्वभाव बदलत नाहीत. हीच श्रेष्ठ पुरूषांची ओळख आहे.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## देहांतनिरूपण

आधुनिक केसरी

मनाविरूध्द घटना घडल्या, नकोनको ते बोल समाजाकडून विनाकारण ऐकून घ्यावे लागले *तरी सद्गुरू वरचा विश्वास किंचितही ढळू देऊ नका. ते आपली परिक्षा पहात आहेत असे समजा,आपला संपूर्ण भार तेच वहाणार आहेत, आपली देहरूपी नौका पलीकडच्या तीरावर सदगुरूच नेणार आहेत. आपलं नेतृत्व, आपला खरे पणा आपला साधेपणा,सचोटीने, सन्मार्गाने जीवन जगण्यासाठी केलेली धडपड सद्गुरूंना माहिती असते. त्यासाठी कोणत्याही प्रकारचा डांगोरा पिटायची गरज नसते. म्हणून म्हणते मित्रांनो कितीही अडचणी आल्या अगदी 100 टक्के आपण खरं वागतो हे आपल्याला माहीत असते तरीही जीवनात अडचणी आल्या तरी डगमगायचे नाही. परमार्थ नीट समजून घ्यावा.त्या प्रमाणे साधना करावी म्हणजे साधकाला आत्मज्ञान होते. जो साधक सन्मार्गाची कास धरतो,सद्गुरू च्या आज्ञेत वागतो त्याने परत परत आत्मानात्म विवेक करत जावा. सतत देहबुद्धीच्या पलीकडचा विचार केला तर विषयविवेचनामध्ये नवनवीन विचार सुचतात, कल्याणकारी समाजासाठी मी काय करू शकतो? समाजातील दुर्लक्षीत,पापभीरू समाजासाठी मी या अल्प वयात काय करू आणि काय नको,अशी सद्विचारांनी मनाची झोळी भरून वहाते. आणि एक लक्षात ठेवा मित्रांनो! आपलं पोट जेव्हा भरलेलं असतं तेव्हाच आपण दुसऱ्या च्या पोटाचा विचार करतो हा तर मानवधर्म आहे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## प्रपंचात 'राम कर्ता' ही भावना ठेवावी

आधुनिक केसरी

प्रपंचात 'राम कर्ता' ही भावना ठेवावी
परमात्मा आनंदरूप आहे. भगवंताचा आनंद हा उपाधिरहित आहे. भगवंताच्या हास्यमुखाचे ध्यान करावे. प्रत्येक गोष्टीत मनुष्य आनंद पाहात असतो. उकाड्यात वारा आला, त्याला वाटते बरे झाले; पाऊस आला की त्याला वाटते, आता गारवा येईल. कोणत्याही तऱ्हेने काय, मनुष्य आनंद साठवू पाहात असतो. मनुष्याला भूक लागेल तेव्हा तो जर अन्न खाईल तर त्याचे पोट भरेल आणि त्यापासून त्याला आनंद होईल; परंतु त्याने विष खाल्ले तर त्याने आनंद न होता मरण मात्र येईल. तसे आपले होते. आपण विषयातून आनंद घेऊ पाहतो आणि तो बाधक होतो. एखाद्या रोग्याला जर जंत झाले आणि त्याला जर खूप खायला घातले तर ते शरीराला पोषक न होता जंतच वाढतात; त्याचप्रमाणे आपण सत्कर्मे करताना पोटात विषयांचे प्रेम ठेवून ती केली, तर त्यामुळे विषयच पोसले जाऊन, त्यांपासून समाधान लाभू शकत नाही. याकरिता कर्तव्यबुद्धीने कर्म करावे, म्हणजे ते बाधक ठरत नाही.
मनुष्य जन्मभर जो धंदा करतो त्याच्याशीच



तो तद्रूप होऊन जातो. एखादा वकील घ्या, तो त्याच्या धंद्याशी इतका तद्रूप होतो की, मरतेवेळीसुद्धा तो वादच करीत जाईल. नोकरी करणारा नोकरीशी इतका तद्रूप होतो की, स्वप्नातदेखील तो स्वतःला नोकर समजूनच राहतो. कर्म कसे करावे तर त्याच्यातून वेगळे राहून. लग्नाचा सोहळा भोगावा, लाडू खावेत, परंतु ते दुसऱ्याचे आहेत असे समजून. आपल्या मुलीचे किंवा मुलाचे नाहीत असे मानून; नाही तर व्याह्यांची काळजी लागायची, किंवा हुंडा मिळतो की नाही इकडे लक्ष लागायचे ! त्यामुळे तापच निर्माण होईल. कर्माशिवाय कोणालाच राहता येत नाही. एखाद्याला शिक्षा द्यायची म्हणून, 'अगदी हलायचे नाही, पापणी, हात, पाय, काहीही हलवता कामा नये,' असे सांगितले तर ते जसे त्याला शक्य होणार नाही, तसे काही ना काही तरी कर्म हे होणारच. भगवंतांनी अशी काही सांगड घालून दिली आहे की, कर्म केल्याशिवाय गत्यंतरच नाही. परंतु ती कर्मे 'राम कर्ता' ही भावना विसरून केली तर बाधक होतात आणि मरणापर्यंत माणूस पुढल्या जन्माची तयारी करीत राहतो; तेव्हा, देहाने कर्म करतानाही ' कर्ता मी नव्हे हे जाणून कर्म करावे. आपल्याला कर्म केल्याशिवाय करमत नाही. पण आपण फळाची आशा उगीचच करीत असतो. आपण फळाची आशा सोडून कर्म करू लागलो, की ते कर्म करीत असतानाच समाधान प्राप्त होते.
**आजचे बोधवचन आहे - प्रपंचात सर्वांकरिता सर्व करावे , पण मनात मात्र 'मी रामाचा आहे' ही अखंड आठवण ठेवावी, म्हणजेच त्याच्या नामात राहावे.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**तुका म्हणे हातीं । कळा सकळ अनंतीं ॥३ ॥
जेवितां ही घरी । नाक हागतिया परी ॥१ ॥
ऐसियाचा करी चाळा । आपुली च अवकळा ॥ध्रु.॥
सांडावें मांडावें । काय ऐसें नाहीं ठावें ॥२ ॥**

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, ८ एप्रिल २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# फडतूस आणि काडतूस ही भपंकगिरी थांबवा हो..!

## पुरोगामी महाराष्ट्रात हे काय चाललंय; आधुनिक केसरी जनचर्चेत वाचकांच्या प्रतिक्रिया

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात हल्ली राजकीय चिखलफेक थांबायचे नाव घेत नाही. असभ्य आणि शिवराळ भाषेचा महाराष्ट्रात गदारोळ माजला आहे. असंस्कृतपणाचा कळस गाठून विरोधक आणि सत्ताधारी एकमेकांची पाठ थोपटून घेत आहेत. यामुळेच शहरापासून ग्रामीण भागापर्यंत विनाकारण या अपशब्दांचे वाईट परिणाम होत आहेत. म्हणूनच रोज फडतूस आणि काडतूस ही चाललेली भपंकगिरी थांबवा हो..,पुरोगामी महाराष्ट्रात हे काय चाललंय?अशी म्हणण्याची वेळ सर्वसामान्यांवर आली आहे. हीच संतप्त भूमिका आधुनिक केसरी जनचर्चेत वाचकांनी मांडली..**

### राजकीय सभ्यतेला लागले ग्रहण...



राजकीय स्वार्थापोटी हा चाललेला फडतूस आणि काडतूस प्रकार महाराष्ट्राचे अतोनात नुकसान करणारा आहे. पुरोगामी महाराष्ट्राच्या इतिहासाला हे अशोभनीय आहे. अगदीच खालच्या दर्जाचे शब्द वापरून चाललेला खेळ असंस्कृतपणाला मूठमाती देत आहे. यावरूनच राजकीय सभ्यतेला सध्यातरी ग्रहण लागले आहे असेच म्हणावे लागेल.

**- सौ. सुरेखा काळुंके , 9702240301**

### अन्यथा... काळ माफ करणार नाही



सध्याच्या राजकीय भंपकगिरीला सर्वसामान्य कंटाळले आहेत. सकाळपासून ते रात्रीपर्यंत वाचाळविरांना उपरतीच आलेली दिसत आहे. एकीकडे मनोरंजन तर दुसरीकडे खोलवर अविश्वास निर्माण होत आहे. राग,असूया, द्वेष बाजूला सारून राजकीय सभ्यता बाळगणे गरजेचे आहे. मर्यादा ओलांडून चाललेला फडतूस आणि काडतूस येळकोट थांबणे महाराष्ट्राच्या हिताचे आहे. अन्यथा यांना काळ माफ करणार नाही.

**- सौ. वनमाला जोगदंड, 9423051246**

### भाषेचे अस्तित्व गमावले...



पुरोगामी महाराष्ट्रात सध्या सभ्यता आणि भाषेचे अस्तित्व गमावले गेले आहे. रोज वाचाळविर तोंडी येईल ते बोलून महाराष्ट्राच्या अस्मितेला ठेच लावताना दिसत आहेत. प्रतिमा आणि प्रतिके यांची लागलेली वाट बघून जनता हताश झाली आहे. त्यांच्या या कृतीचे जनता निषेध व्यक्त करणार आणि येत्या काळात त्याचे पडसाद नक्कीच दिसून येणार.

**- अदिनाथ शेप, 9881882192**

### बेताल वक्तव्ये ट्रेंड होत आहेत...



अलीकडे मराठी भाषेचा राजकीय लोकांकडून होत असलेला वापर बघितला की समंजसपणाची सोडलेली पातळी लक्षात येते. ऐकमेकावर सारेच तुटून पडलेले आणि अंगावर धावणारे चित्र महाराष्ट्राचे नुकसान करणारे आहे. म्हणजेच हताशपणे भरकटून जात केलेली वक्तव्ये अलीकडे ट्रेन्ड बनू पाहत आहेत. तो ट्रेंड महाराष्ट्राला घातक ठरणारा आहे.

**- शेखर भाकरे , 7719814815**

# अखेर पंचायत समिती प्रशासन नरमले

## पुलाचे बांधकाम अंदाजपत्रकानुसार करा; ग्रा.पं.ला गटविकास अधिकाऱ्यांचे आदेश

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** तालुक्यातील सूनगाव ग्रामपंचायतने गोरक्षनाथ मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे नाल्यावरील पुलाचे बांधकाम हे अंदाजपत्रकांनुसार केलेले नाही व निकृष्ट दर्जाचे केलेले आहे याकरिता सूनगाव येथील नागरिक विजय शत्रुघ्न वंडाळे व गजानन मारोती धुळे यांनी गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केली होती. परंतु दीड महिना उलटून गेल्या नंतरही या पुलाची कोणतीच चौकशी झाली नाही. त्यानंतर गटविकास अधिकारी यांनी 27 3 2023 रोजी या पुलाच्या चौकशीसाठी एक चौकशी समिती गठित करण्यात आली होती त्यामध्ये विस्तार अधिकारी मोरे बांधकाम शाखा अभियंता घीवे व विस्तार अधिकारी टाकळकर अशी समिती नेमली होती परंतु या समितीने सदर पुलाची चौकशी करण्यास नकार दिला त्यामुळे 23 3 2023 रोजीच्या तक्रारीनुसार तक्रारकर्त्यांनी उपोषणाचा इशारा दिला होता त्यानुसार पंचायत समिती कार्यालयासमोर 5 एप्रिल रोजी उपोषण कर्ते उपोषणास बसले होते. सलग दुसऱ्या दिवशीही उपोषण चालूच होते व पंचायत समिती प्रशासन आज दिवसभर उपोषणकर्त्यांना मोघम पत्र देत उपोषण मागे घेण्यास विनंती करीत होते परंतु उपोषण करते यांच्या म्हणण्यानुसार पुलाचे बांधकाम करण्यासाठी अंतिम तारीख द्यावी व हे दिलेल्या तारखेच्या आत करण्यात यावे त्यामुळे आम्हाला अंतिम तारीख लेखी पत्रावर पाहिजे



असे मागणी रेटून धरल्यामुळे सुनगाव ग्रामपंचायत व पंचायत समिती प्रशासनाची मिलीभगत ही उपोषणकर्त्यांच्या माध्यमातून जनतेच्या समोर आली आहे. त्यानंतर सदर पुलाचे बांधकाम हे अंदाजपत्रकानुसार नुसार झालेले नाही हे मान्य करीत पंचायत समिती प्रशासनाने नरमाईची भूमिका घेत सदर पुलाचे बांधकाम हे 7 6 2023 पर्यंत अंदाजपत्रकानुसार करावे असा लेखी पत्र जावक क्र. 180 दि. 6 /4/ 2023 ग्रामपंचायतला देत त्याची प्रत उपोषणकर्त्यांना तसे लेखी पत्र देत आज दिनांक 6 एप्रिल रोजी पाच वाजेच्या सुमारास सदर उपोषणकर्त्यांचे उपोषण हे पंचायत समिती बांधकाम अभियंता (जे .इ.) काळपांडे व विस्तार अधिकारी राजपूत यांच्या हस्ते उपोषण कर्त्यांना थंड पेय पाजून उपोषण सोडविण्यात आले.

# नाशिकमध्ये एसटी बसचा अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** जिल्ह्यातून धक्कादायक बातमी समोर आली असून देवळा मनमाड मार्गावर एसटीला भीषण अपघात झाला आहे. अपघातात महिला वाहकाचा जागीच तर एका प्रवाशी महिलेचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला असून अनेक प्रवासी जखमी असल्याची आहेत. सद्यस्थितीत जखमींना रुग्णालयात दाखल करण्याचे काम सुरु असल्याची माहिती आहे. नाशिक जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांत एसटी अपघाताच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे चित्र आहे. अशातच मनमाड आगाराच्या बसला भीषण अपघात झाला आहे. चांदवड शहराजवळील मतेवाडीजवळ हा भीषण अपघात झाला असून बसमधील 20 ते 22 प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. ही बस मनमाड आगारातून सुटून नांदुरीकडे गेली होती. तिकडून परतत असताना चांदवड शिवारातील मतेवाडीजवळ हा भीषण अपघात झाला. समोरुन येणाऱ्या वाहनाने कट मारल्यानंतर एसटीचा रॉड तुटल्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले आणि एसटी बस थेट समोरील झाडावर आदळून अपघात झाला. अपघातात सारिका लहिरे या महिला कंडक्टरचा जागीच मृत्यू झाला तर एका महिला प्रवाशाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. देवळा-मनमाड रोडने मनमाडकडे येत असताना मतेवाडी शिवारातील गांगुर्डे वस्तीजवळ बस झाडावर आदळली. अपघात एवढा भीषण होता की, बसच्या एका बाजूचा चक्काचूर झाला आहे. जखमींना तातडीने चांदवडच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# सप्तश्रृंगगड शिखरावर कीर्तिध्वज फडकला

आधुनिक केसरी न्यूज

**वणी :** साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या सप्तश्रृंग गडावर विधीवत पूजन व मिरवणूक काढल्यानंतर मध्यरात्री कीर्तिध्वज शिखरावर फडकला. पहाटेपासून त्याचे दर्शन भाविकांना होत आहे. शिखरावर जाण्यासाठी बाहेरुन दिसणारा कुठलाही मार्ग नाही. झाडे, झुडपे नाहीत. त्यामुळे कीर्तीध्वज शिखरावर कसा लावला जातो, हे अनुभवण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

सप्तश्रृंगी गडावर सप्तश्रृंगी देवीचा चैत्रोत्सव सुरू आहे. भगवतीच्या दर्शनासाठी उत्तर महाराष्ट्रातून लाखो भाविक अनवाणी पावलांनी गडावर दाखल होत आहेत. सकाळी देवीच्या अलंकारांची ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. महापूजा विश्वस्त डॉ. प्रशांत देवरे यांनी सपत्नीक व ग्रामपंचायत सदस्या जयश्री गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आली. उत्तर महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या सप्तशृंगी निवासिनी देवीच्या चैत्रोत्सव यात्रेदरम्यान खान्देशातून माहेरची भेट घेऊन आलेल्या भाविकांच्या उपस्थितीत दुपारी पारंपरिक पद्धतीने मानकरी पूजाऱ्यांसह कीर्तिध्वजाचे विधिवत पूजन देवी संस्थानचे अध्यक्ष वर्धन देसाई, तहसीलदार बी.ए. कापसे, ॲड. ललित निकम, शशिकांत बेनके आदींच्या हस्ते करण्यात आले.




# मोदींचा कानमंत्र

आधुनिक केसरी

२०१४ पर्यंत केंद्रात सत्तेत राहिलेल्या विरोधकांच्या राजेशाही मनोवृत्तीमुळे देशातील गरीब, वंचित, दलित, आदिवासींपर्यंत विकास पोहोचला नाही. भाजपसाठी सामाजिक न्याय ही निव्वळ राजकीय घोषणा नव्हे तर, 'धर्मसिद्धांत' आहे, असा कानमंत्र पक्षकार्यकर्त्यांना देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी मतदारांनाही साद घातली. भाजपच्या ४४ व्या स्थापनादिनानिमित्त गुरुवारी देशभरातील सुमारे दहा लाख कार्यकर्त्यांना उद्देशून केलेल्या भाषणातून मोदींनी आगामी लोकसभा निवडणुकीतील पक्षाच्या प्रचाराची दिशाही निश्चित केली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजप सलग तिसऱ्यांदा विजयी होईल, असा विश्वास मोदींनी व्यक्त केला. 'लोक म्हणू लागले आहेत की, २०२४ मध्ये भाजपला कोणीही पराभूत करू शकणार नाही. त्यांचा कयास तंतोतंत खरा ठरेल. पण, कार्यकर्त्यांनी निवडणुका जिंकण्यापुरते सीमित राहू नये. त्यांनी देशातील प्रत्येकाची मनेही जिंकली पाहिजेत', असे मोदी म्हणाले. १९८० पासून आत्तापर्यंत ज्या त्वेषाने आपण प्रत्येक निवडणूक लढलो, तीच ऊर्जा आणि मेहनत आपल्याला टिकवता आली पाहिजे. तरच आपण भविष्यातही प्रत्येक निवडणूक जिंकू शकू, असे मोदी म्हणाले. मोदींचे हे भाषण दूरचित्रसंवादाद्वारे देशभरातील कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवले गेले. देशभर हनुमान जयंती साजरी केली जात आहे. भगवान हनुमानाप्रमाणे भाजपनेही आव्हानांना सामोरे जाण्याचा आणि यशस्वी होण्याचा दृढसंकल्प केला आहे. भाजपकडे 'करून दाखवू' ही वृत्ती आहे. काँग्रेससह त्यांचे मित्रपक्ष छोटी स्वप्ने बघतात. मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्याची कुवत त्यांच्यामध्ये नाही. भाजपने मात्र नेहमीच देशाला प्राधान्य दिले. सर्व घटकांच्या सक्षमीकरणासाठी काम केले. 'सबका साथ आणि सबका विश्वास' ही भाजपची राजकीय संस्कृती आहे, असे मोदी म्हणाले. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये विरोधकांनी मोदी सरकार लोकशाहीविरोधी असल्याचा आरोप केला होता. संपूर्ण अधिवेशनाचे कामकाज सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या आरोप-प्रत्यारोपात वाहून गेले. या पार्श्वभूमीवर, मोदींनी भाजपच्या कार्यकर्त्यांना लोकशाहीचे महत्त्व समजावून सांगितले. "भारत ही लोकशाहीची जननी आहे, त्या स्त्रोतातून भाजपचाही जन्म झाला आहे. लोकशाही मूल्यातून भाजप आणि पक्षाच्या तमाम कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळते. लोकशाही प्रणालीवर पक्षाचा विश्वास असून संविधान आणि ही मूल्ये अधिक दृढ बनवण्याचा भाजपने सातत्याने प्रयत्न केला", असे मोदी म्हणाले. समाजमाध्यमांसारख्या नव्या संवादपद्धतीचा पक्षाला आणि कार्यकर्त्यांना वापर करावा लागेल. आजच्या यूट्यूब, ट्विटर, फेसबुक आणि इन्स्टाग्रामच्या युगात तरुण पिढीशी जोडणारे राजकारणाचे नवे पर्याय विकसित करावे लागतील. पंचायतीपासून संसदेपर्यंत कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणासाठी नवे व्यासपीठ निर्माण करावे लागेल, अशी सूचना मोदींनी केली. नवीन कल्पना, नवे शोध स्वीकारावे लागतील. अविभाज्य घटक म्हणून ते पक्षात सामावून घेतले पाहिजेत. पक्षाच्या प्रत्येक स्तरावर तंत्रज्ञान विभाग बनवला पाहिजे. तरुणांचा चमू करून आधुनिक तंत्रज्ञानाची अद्ययावत माहिती घेतली पाहिजे. अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी पक्षाला तंत्रज्ञानाचा वापर करावा लागेल, असेही मोदी म्हणाले.

# असंसर्गजन्य आजारांचे वाढते आव्हान चिंताजनक



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**तंबाखूचे वाढते प्रमाण, दारूचे व्यसन, रोजच्या आहारात फळे आणि भाज्यांचा अभाव, आहारात मिठाचा अतिवापर, चुकीची जीवनशैली आणि शारीरिक कसरतींचा अभाव अशा कारणांमुळे मधुमेह व उच्च रक्तदाबासारख्या आजारांचे प्रमाण जगभरात वाढत आहे. राज्यातही मधुमेह आणि उच्च रक्तदाबाची परिस्थिती बिकट आहे. राज्य सरकारच्या आरोग्य विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार 2018 ते 3 एप्रिल 2023 पर्यंत उच्च रक्तदाबासाठी एक कोटी 88 लाख 21 हजार 467 नागरिकांची चाचणी करण्यात आली. त्यांपैकी 19 लाख 59 हजार 429 नागरिकांना निदान झाले आहे.**

राज्यात रक्तदाबाच्या 19 लाख 38 हजार 457 रुग्णांवर उपचार सुरू आहेत. त्याच कालावधीत एक कोटी 87 लाख 38 हजार 141 नागरिकांची मधुमेह चाचणी झाली आहे. त्यांपैकी नऊ लाख 32 हजार 153 नागरिकांचे निदान झाले असून आठ लाख 50 हजार 614 रुग्णांना मधुमेहाच्या उपचारांची गरज भासली आहे. असंसर्गजन्य आजारामुळे जगातल्या एकूण 8 अब्ज लोकसंख्येपैकी जगभरात दरवर्षी होणाऱ्या मृत्यूंपैकी 18 टक्के मृत्यू 1.3 अब्ज लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात होत आहेत. संयुक्त राष्ट्राच्या जागतिक आरोग्य अहवालामध्येही असाच उल्लेख करण्यात आला आहे. असंसर्गजन्य आजारांमुळे (हृदयरोग, मधुमेह आणि कॅन्सर) येणाऱ्या काही वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेवर फार मोठा परिणाम होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या अहवालात सांगण्यात आले आहे की,2012 ते 2030 या कालावधीत या आजारांच्या उपचारांवर जवळपास 31 लाख कोटी रुपये खर्च होईल. हा अहवाल शहरी लोकसंख्येच्या विकासावर पडलेल्या परिणामावर आधारित आहे. वाढते शहरीकरण, कामाचा व्याप आणि जीवनशैली आदी गोष्टी या घातक आजारांसाठी जबाबदार आहेत. संयुक्त राष्ट्रचा अहवाल सांगतो की, 2014 ते 2050 दरम्यान 40 कोटी जनता शहरांचा हिस्सा असणार आहे. याचा अंदाज बांधल्यास शहरी अनियोजनाचे चित्र पाहिल्यास किती भयंकर असणार आहे. आजचीच अवस्था इतकी बिकट आणि गलिच्छ आहे की आणखी तीस वर्षांपर्यंतचे चित्र किती भयानक असेल. आजही आपण शहरांच्या विकासाकडे नीटसे पाहत नाही. आकड्यांचा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, देशात दरवर्षी होणाऱ्या एकूण मृत्यूंपैकी सहा मृत्यू कॅन्सरने होत आहेत. जागतिक स्तरावर हाच आकडा आठ टक्के आहे. अशाच प्रकारे भारतात सहा कोटींपेक्षा अधिक मधुमेहाचे रुग्ण आहेत. भारतातील बहुतांश लोकसंख्या श्वसनासंबंधीच्या आजाराने आणि फुफ्फुसाच्या आजाराने त्रस्त आहे. यामुळे भारत जगातील सर्वाधिक आजारांचे ओझे वाहून नेणारा देश आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.जर आपण या आजारांवर नियंत्रण आणू शकलो नाही तर आपल्या देशाची ओळख आजारांचा देश म्हणून होत राहील.

जानेवारी 2015 मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने (डब्लूटीओ) ने खुलासा केला होता की, जगात असंसर्गजन्य आजाराने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. जगात दरवर्षी दीड कोटी कॅन्सर, मधुमेह आणि हार्ट अटॅकसारख्या गैरसंक्रमण आजाराने माणसे मरत आहेत.जर अशा आजाराने ग्रस्त लोकांना वेळेत उपचार मिळाल्यास त्यांचा जीव वाचू शकतात. अहवालानुसार भारतात या आजाराने तीस ते सत्तर वयाच्या दरम्यानच्या लोकांची मृत्यूची शक्यता 26.2 टक्के इतकी आहे. तुलना करायची झाल्यास हा आकडा दक्षिण आशिया आणि आफ्रिकातील काही देशांच्या तुलनेत खूपच खराब आहे. डब्लूटीओनुसार पी-5 देशांमधील (रशिया, चीन, फ्रान्स, ब्रिटेन आणि अमेरिका) फक्त रशियाची स्थिती (29.2 टक्के) भारतापेक्षा वाईट आहे. 2012 मध्ये भारतात 52.2 टक्के लोकांचा मृत्यू या असंसर्गजन्य आजाराने झाले होते. जागतिक आरोग्य संघटनेने मान्य केले आहे की, असंसर्गजन्य आजारांमध्ये कॅन्सर, मधुमेह, हृदयरोग आणि श्वसनासंबंधीचे प्रमुख चार आजार आहेत. काही वर्षांपूर्वी जागतिक आरोग्य संघटना आणि आंतरराष्ट्रीय ऑलम्पिक समितीद्वारा लोकांच्या जीवनशैलीमध्ये सुधारणा आणण्याच्या दृष्टीकोनातून व्यापक स्वरुपात काही गोष्टींवर सहमती झाली होती आणि असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रणही येईल, अशी आशाही करण्यात आली होती.मात्र दुर्दैव असे की, अजूनही या दिशेने पावलेच उचलली गेली नाहीत. या आजारांवर लवकर नियंत्रण आणले गेले नाही तर या आजाराने मृत्यू होणाऱ्यांची संख्या दरवर्षी 6 कोटी होऊन जाईल, असे मानले जात आहे. 21 व्या शतकात या आजारांवर नियंत्रण आणणं मोठं आव्हान असणार आहे. वेगाने बदलत चाललेली जीवनशैली, खाणंपिणं आणि शारीरिक व्यायामाचा आभाव यांमुळे जीवनावर विपरीत परिणाम होत आहे. जो घातक आहे. जगातील एक तृतीयांश लोकांचे आयुष्य निर्धारित वेळेअगोदरच नष्ट होत चालले आहे. कॅन्सर, मधुमेह, हृदय, श्वसनरोग आणि मानसिक आजार यांसारख्या असंसर्गजन्य आजारांशी सामना करण्यासाठी योग्य पावले उचलली जात नाहीत, हे आपल्या देशाचे दुर्दैवच म्हटले पाहिजे. आपल्या देशात कॅन्सर, हृदयरोग, मधुमेह आणि मस्तिष्क आघाताने मरणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. या आजारांवर खर्चही भरमसाठ केला जात आहे,मात्र त्याप्रमाणात परिणाम येताना दिसत नाहीत. वीस वर्षांपासूनच्या लोकांमध्ये या आजारांवर जनजागृती आणण्याची गरज आहे. व्यायामाचे महत्त्व आणि सकस अन्न यांचे मार्गदर्शन होण्याची आवश्यकता आहे. आणखी एका अहवालानुसार भारतातल्या 42 ते 64 वर्षे वयांतील 42 टक्के लोकांचे मृत्यू या आजारांनीच झाले आहेत. कॅन्सरवर जितक्या लवकर उपचार सुरू होतील, तितक्या लवकर हा आजार आटोक्यात येऊ शकतो. अलिकडच्या काळात कॅन्सर रुग्णांवर आधुनिक पद्धतीने उपचार होत आहेत.



औषधे उपलब्ध आहेत,मात्र या औषधांच्या किंमती सामान्यांच्या आवाक्यात नाहीत. त्या स्वस्त होण्याची आवश्यकता आहे. मुळात आपल्या गावपातळीवरील आरोग्य सेवा पुरती खिळखिळी झाली आहे. आरोग्य, भौतिक सुविधा नाहीत. औषधांचा पुरवठा होत नाही. वैद्यकीय आधिकारी आणि इतर कर्मचारी यांची वर्षोंवर्षे भरती करण्यात आली नाही. त्यामुळे स्थानिक परिसरात उपचार वेळेवर मिळत नाहीत. त्यामुळे लोकांना महागड्या, शहरातल्या दवाखान्यात उपचार घ्यावे लागतात किंवा उपचाराभावी कुडत मरावे लागते. असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण आणण्यासाठी ठोस उपाययोजनांची गरज आहे. शासनाबरोबरच मोठमोठी देवस्थाने, सामाजिक संस्था यांनीही यासाठी पुढाकार घ्यायला हवा. त्याचबरोबर लोकांनीही आपल्या आरोग्याची काळजी घेण्याबाबत दक्ष राहिले पाहिजे. वजन आणि रक्तदाब कमी करण्यासाठी आहारासोबत योगाभ्यास आवश्यक आहे. उच्च रक्तदाब व्यायाम आणि योगासनांनी कमी करता येतो. चालणे, पोहणे, सायकल चालवणे आणि धावणे असे व्यायाम प्रकार फायदेशीर आहेत.

# फडतुस पण त्यांनीच, पायउतार केले ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**मा.उद्धव ठाकरे राज्याचे मुख्यमंत्री म्हणुन काम करत होते. पण अचानक असं काही घडलं की मोठा राजकिय भुकंप झाला. त्यांच्याच पक्षातील 40 आमदार बाहेर पडले आणि मुख्यमंत्री पदावर एकनाथ शिंदे बसले. राजकारणात कधी काय घडेल? नेम नसतो. वर्षावरून स्वत: ड्रायविंग करत साहेब मातोश्रीवर जावुन बसले. ज्यांना आज फडतुस म्हणालात, तुम्हाला पायउतार करण्यामागे ते एक निमित्तच होते. स्वत:ला देवेंद्र फडणवीसांनी काडतुस म्हणवुन घेतले, तेही खरेच. जर भिजलेलं काडतुस असतं तर पुन्हा हे मातोश्रीवर अडीच वर्षे अजुन गेले नसते. संजय राऊतांची काव काव याच राजकिय अस्वस्थेपोटी म्हणावी लागेल.**

कुणी कुणाला कमी समजु नये. मी पुन्हा येणार या शब्दांचीही अडीच वर्षे ज्यांनी थट्टा केली ते पुन्हा आल्यानंतर त्यांच्या तोंडातले दात आपोआप गळुन पडले. उद्धव ठाकरेंनी गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री यांचा उल्लेख फडतुस केल्यानंतर राजकिय वर्तुळात खळबळ उडाली. त्यातही कावळा डोकावल्याप्रमाणे टोच मारताना संजय राऊतांनी तेल घालत फडतुसचा अर्थ समजुन सांगितला. शिंदे-फडणवीस सरकार सत्तेवर आल्यानंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आलं. ठाकरे सरकार अडीच वर्षे सत्तेवर होतं. देशात असं कधीच घडलं नाही ज्या सरकारच्या गृहमंत्र्यावर लाचखोरीचे आरोप झाले. अनिल देशमुख गृहमंत्री होते. पोलीस अधिकाऱ्यांनी गृहमंत्र्याला प्रति महिना किती रूपये जातो ? जाहिर आरोप केला. 100 कोटीच्या आरोपाखाली तब्बल वर्षभर देशमुख जेलमध्ये गेले. महाराष्ट्राच्या इतिहासात गृहमंत्री जेलमध्ये असं कधी घडलं नाही. याची जबाबदारी तत्कालीन मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरेंकडे जात नाही का ? त्या काळात पोलीसांच्या बदल्या ज्यात मोठ्या प्रमाणावर झालेले गैरव्यवहार अनेक चर्चेला आले. आज ज्यांना फडतुस गृहमंत्री तुम्ही म्हणता मग तत्कालीन काळात जेलमध्ये गृहमंत्री जात असेल तर मुख्यमंत्री फडतुस म्हणावा लागणारच. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे उद्धव ठाकरेंनी फडतुस गृहमंत्री असा उल्लेख केल्यानंतर शब्दावरून छळ सुरू झाला. कारण सामान्य लोकांना देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत केलेला उल्लेख रूचलाच नाही. कारण गृहमंत्री म्हणुन त्यांची कामगिरी आणि पारदर्शक कारभार जनता पहाते. येथे पाहिजे जातीचे, येरा गबाळ्याचे काम नोहे, राज्य चालवणं कदाचित उद्धवजी यांचं कामच नव्हतं. पण संजयामार्फत घेतलेले आत्मघातकी निर्णय ज्यामुळे पक्षाची वाताहत झाली. आता शिल्लक राहिलेला पक्ष जिवंत ठेवण्यासाठी सुरू असलेली धडपड त्या उद्विग्नेतुन तोंडून बाहेर पडलेले शब्द काय तर म्हणे फडतुस ?एखादा अवलिया माणुस अनेकांच्या दृष्टीने टिकेचा असतो पण त्यानेच हिसका दाखवलेला याचंही आत्मचिंतन करायला हवं. भाजपला धोका 2019 ला दिला केवळ मुख्यमंत्री पदावर बसण्यासाठी मतदारांचाही आदर केला नाही. कारण जनादेश काय होता ? हे लोकांना माहित. त्या काळात देवेंद्र फडणवीसांनी मी पुन्हा येणार ही आरोळी दिली होती. अपघाताने महाविकास आघाडीचं सरकार बनलं. पण त्या आरोळीला टिकेचं लक्ष्य बनवलं. पण हिंमत



ज्या नेतृत्वात असते ना, त्याला राजकारणात जय-पराजय दोन्ही गोष्टी मान्य असतात. पेरलं ते उगवतं किंवा नियत वेळ आली की सुड घेते. सारं काही मातोश्रीच्या अंगलट आलं. एखाद्या पक्षाची वाताहत किती व्हावी ? आणि कशी व्हावी ? यालाही काही अंत नसतो. मग शिंदे गट बाहेर पडला म्हणा, शिवसेना फुटली म्हणा, चिन्ह गेलं पक्ष गेला कदाचित या साऱ्या पार्श्वभुमीमागे अप्रामाणिकपणा ज्यांची त्यांना भोवला असं म्हणता येईल. ज्यांचा उल्लेख आज फडतुस म्हणुन ठाकरेंनी केला, त्यांनीच वर्षा बंगल्यावरून मातोश्रीला जायला भाग पाडले. तेही स्वतःची गाडी स्वतः चालवत. म्हणुन शब्दाचा कोट केला आणि पराचा कावळा करत कितीही बोंबा ठोकल्या तरीही कोणताच माणुस कुणालाही कमी नसतो हे तितकंच खरं.देवेंद्र फडणवीसांनी करूनच दाखवलं. ते पुन्हा आले. अर्थात त्यांच्या पक्षाची वाताहत झाली मग राज्याला स्थिर सरकार देण्यासाठी भाजपाने शिंदे गटाला पाठिंबा दिला. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री पदावर बसले. त्यांनी गृहमंत्री पद देवेंद्र फडणवीसांकडे दिलं. या साऱ्या चित्रपटाचे निर्माते फडणवीस असल्याचा उल्लेख एकनाथ शिंदेंनी पहिल्याच अधिवेशनात सभागृहात केलेला आहेच. मग सांगा बरं, तुम्ही फडतुस म्हणालात, पण त्यांनीच पायउतार करून तुम्हाला मातोश्रीवर पाठवुन दिलं हे ध्यानात घ्यायला हवं.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# भाविकांचे श्रद्धास्थान ग्रामदैवत श्रीक्षेत्र काळभैरवनाथ !

आधुनिक केसरी

भक्तांच्या हाकेला धावणाऱ्या आणि नवसाला पावणाऱ्या मांगूरच्या श्रीकाळभैरवनाथ देवाचा लौकिक सर्वदूर पसरला आहे कर्नाटक - महाराष्ट्रातील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान व ग्रामस्थांचे ग्रामदैवत असलेल्या श्रीक्षेत्र काळभैरवनाथ यात्रा महोत्सव शनिवार दि. 8 एप्रिल 2023 ते बुधवार दि.12 अखेर संपन्न होत आहे या महोत्सवानिमित्त थोडक्यात.

मांगूर गावचे ग्रामदैवत असलेले काळभैरवनाथ देवस्थान असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान आहे या ठिकाणच्या मंदिरात भैरवनाथांच्या दर्शनासाठी भाविकांची नेहमीच मोठी गर्दी असते भक्तांच्या हाकेला धावणारे आणि त्यांच्या मनोकामना पुर्ण करणारे देवस्थान म्हणून या मंदिराकडे पाहिले जाते जन्मकाळ सोहळा, यात्रा व सणासुदीच्या काळात या ठिकाणी महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीय आहे महाराष्ट्र - कर्नाटक सीमेवर निपाणी तालुक्यातील दूधगंगा नदीवर वसलेलं आणि श्री.भैरवनाथांच्या पदस्पर्शाने पावन झालेले मांगूर हे गाव, येथील ग्रामस्थांची या दैवतावर मोठी श्रद्धा आहे या दैवतावर श्रद्धा ठेवून कोणतेही काम केल्यास ते पूर्णत्वास जाते असा भाविकांचा अनुभव आहे येथील मंदिरामध्ये काळभैरव आणि बाळभैरव अशा दोन मूर्ती एकत्र आहेत काळभैरवाची मूर्ती चतुर्भुज व बाळभैरवाची मूर्ती त्रीभूज आहे काळभैरवाच्या उजव्या वरच्या हातात डमरू व खालच्या हातात तलवार आहे तर डाव्या हातात वर त्रिशूळ व खालच्या हातात पानपात्र आहे बाळभैरव मूर्ती त्रिभूज असून त्याच्या हाती ढाल व तलवार आहे जवळच एक जागृत वेताळ मंदिर असून मंदिरासमोर भव्य असे पटांगण आहे या ग्रामदेवतेविषयी वयोवृद्ध जाणकारांकडून लोककथा सांगितली जाते ती अशी दूधगंगा - वेदगंगा नदीच्या संगमावरील हा परिसर शांत व रम्य असा आहे या परिसराच्या वैभवावर एका क्रूर राक्षसाची नजर पडली हा राक्षस परिसरातील जनतेला त्रास देवू लागला त्यामुळे जनतेने भगवंताची पूजा - अर्चा करुन प्रार्थना केली या प्रार्थनेच्या आधारेच जनतेने भैरवनाथांला प्रसन्न करुन घेतले भैरवनाथांने दुष्ट राक्षसाचा वध करुन जनतेची त्यांच्या त्रासातून सुटका केली जनतेच्या रक्षणासाठीच भैरवनाथांचे मांगूर येथे वास्तव असल्याचे बोलले जाते प्रतिवर्षी गुढीपाडवा झाल्यानंतर येणाऱ्या तिसऱ्या रविवारी व जोतिबाची यात्रा झाल्यानंतर येणाऱ्या रविवारी ही यात्रा भरते रविवारी यात्रेचा मुख्य दिवस असतो या दिवशी श्रीं ची प्राणप्रतिष्ठापना, अभिषेक, व श्रींची पालखी मिरवणूक सासणकाठ्यासह निघते भाविक गुलालाची उधळण करीत भैरोबाच्या नावानं






चांगभलंच्या गजरात हा परिसर दुमदुमून सोडतात गुढीपाडव्या दिवशी कुराडे व इंग्रोळे यांच्या दोन सासणकाठ्यांचे पूजन करुन भैरवनाथ मंदिरासमोर या सासणकाठ्या बांधून पडव्यापासून यात्रेपर्यंत प्रत्येक रविवारी रात्री सासणकाठ्यांची भैरवनाथ मंदिराच्या मिरवणुकीने फेरी काढली जातेण. यात्रेदिवशी नंदगाव, ता.करवीर येथील पांडुरंग मगदूम यांची सासणकाठी येते या तिन्ही सासणकाठ्या मानाच्या आहेत विशेष म्हणजे बेळगांव जिल्ह्यातील एकमेव श्रींची पालखी व मानाच्या सासणकाठ्यांची मिरवणूक सोहळा असतो आणि तो पाहण्यासाठी भाविकांची मांदियाळी असते, यात्रेदरम्यान आतशबाजी ऑर्केस्ट्रा, तमाशा, कुस्ती सारख्या कार्यक्रमांची रेलचेल असते मंदिरासमोर भव्य मंडप उभारणी करुन मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येते यात्रेमुळे परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघतो मांगूर चंदेरी नगरीत सर्व जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहतात कोणतेही सामुदायिक कार्य अथवा सण, उत्सव सर्वजण भक्तीभावाने पार पडतात या मागे ग्रामस्थांमध्ये काळ भैरवनाथांबद्दल असणारी श्रद्धा दिसून येते.

# १७ हजार शिधापत्रिकाधारकांना मिळणार आनंदाचा शिधा

## आंबेडकर जयंतीनिमित्त सामान्य लोकांचे तोंड गोड करण्याचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** महाराष्ट्र शासनाने दिवाळीप्रमाणेच गुढीपाडवा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त राज्यातील शिधापत्रिकाधारकांना 'आनंदाचा शिधा' देऊन सामान्य लोकांचे तोंड गोड करण्याचा निर्णय घेतला होता. ह्या शिधा वाटपाच्या माल शुक्रवारी (ता.७)धर्माबाद तहसील पुरवठा विभागात पोहचला असून या 'आनंदाच्या शिद्याचे' तहसीलदार दत्तात्रय शिंदे यांच्या हस्ते पूजन करून शिधा ग्रामीण भागात वितरणासाठी रवाना करण्यात आला.सामान्य व गोरगरीब जनतेचे सण - उत्सव गोड व्हावे यासाठी शासनाने शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयांत १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर आणि १ लिटर तेल देण्याचा निर्णय घेतला.महागाईच्या काळात जगणं मुश्किल होत असताना या आनंदाच्या शिद्यामुळे लोकांना तेवढाच दिलासा मिळत आहे. धर्माबाद तालुक्यात एकूण १७ हजार ४४४ शिधापत्रिकाधारक आहेत. यापैकी २४५५ अंत्योदय कार्डधारक,१०८१८ प्राधान्य योजना, तर ४१७१ केशरी रेशनकार्डधारक आहेत. या सर्वांना ई-पॉस'द्वारे शिधा वितरित केला जाणार आहे. 'ई-पॉस'ची व्यवस्था नसलेल्या ठिकाणी ऑफलाइन पद्धतीने हा शिधा दिला जाईल. ह्या शिधा वाटपसाठी गुडी पाडवा ते आंबेडकर जयंती या दरम्यानचा कालावधी शासनाने निर्धारित केला होता. पाडव्याला हा शिधा काही तांत्रिक कारणामुळे पोहचू शकला नसला तरी डॉ. आंबेडकर जयंती निमित्त आनंद शिधा लोकांना मिळणार असल्यामुळे लोकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. धर्माबाद तालुक्यातील सर्व पात्र शिधापत्रिकाधारकांना वेळेत 'आनंदाचा शिधा' वितरित करू असा विश्वास नायब तहसीलदार तथा पुरवठा अधिकारी पंडित राठोड यांनी व्यक्त केला.



धर्माबाद तालुक्यासाठी आनंदाच्या शिधा किटमधील साखर, चनाडाळ, रवा व तेल सर्व वस्तू प्राप्त झाल्या असून आज बन्नाळी, माष्टी या गावात वितरणास सुरवात केली .डॉ . बाबासाहेब आंबेडकर जयंती पूर्वी हा शिधा सर्व गावात लोकांना वितरित होईल . ह्या सर्व वस्तू लोकांना अवघ्या शंभर रुपयात मिळणार आहेत . यावेळेस साईनाथ गोरजे, धर्मान्ना तोंडाकूरवाड, माधव अवधूते, देवके, मंगरुळे पाटील, शिवशेटे पाटील, गंगाधर अवधूते, मिटूवाघमारे, राहुल वाघमारे, धनकवाड, व आदि उपस्थित होते .

**दत्तात्रय शिंदे, तहसीलदार, धर्माबाद**

आनंदाच्या शिद्याचे सर्व वस्तूचा माल गोदामात आला असून तो लवकरात – लवकर लोकांना मिळावा यासाठी आम्ही प्रयत्न करु .

**अशोक भालेराव, गोदामपाल**

# मनपा मालमत्ता विभागाचे दोन कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात

## तक्रारदाराला १५ हजार लाच मागणे भोवले

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** तक्रारदाराला आधार केंद्र सुरू करण्यासाठी मनपाची शासकीय जागा उपलब्ध करून देण्यासाठी १५ हजार रूपयांची लाच स्विकारणाऱ्या महानगरपालिकेच्या कनिष्ठ लिपीकासह कंत्राटी कनिष्ठ अभियंत्याला ॲन्टी करप्शन विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई गुरूवारी (दि.६) मनपा मुख्यालय परिसरात करण्यात आली.

निखील मुकुंद गायकवाड (वय २९) असे मालमत्ता विभागातील कनिष्ठ लिपीकाचे नाव आहे. तर शेख मोईनोद्दीन शेख नईम (वय ३०) असे कंत्राटी कनिष्ठ अभियंता असे लाचखोर कर्मचाऱ्यांची नावे आहेत. तक्रारदाराला आधार केंद्र सुरू करण्यासाठी जागेची आवश्यकता असल्याने त्याने मनपाच्या मालमत्ता विभागाशी संपर्क साधला होता. त्यावेळी मालमत्ता विभागातील कनिष्ठ लिपीक निखील गायकवाड व शेख मोईनोद्दीन शेख नईम यांनी १५ हजार रूपये लाच देण्याची मागणी २८ व ३१ मार्च रोजी तक्रारदाराकडे केली होती. तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्याने ॲन्टी करप्शन विभागाकडे तक्रार केली होती.

ॲन्टी करप्शन विभागाचे पोलिस अधीक्षक संदीप आटोळे, अपर अधीक्षक विशाल खांबे, उपअधीक्षक मारूती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक दिपाली निकम, पोलिस अंमलदार भिमराव जिवडे, सुनील पाटील, अशोक नागरगोजे, दत्ता होरकटे, चंद्रकांत शिंदे, चांगदेव बागूल आदींच्या पथकाने गुरूवारी मनपा मुख्यालयाजवळ सापळा रचून १५ हजार रूपयांची लाच स्विकारणाऱ्या शेख मोईनोद्दीन शेख नईम यांना ताब्यात घेवून चौकशी केली असता शेख मोईनोद्दीन शेख नईम यांनी निखील गायकवाड यांच्या आदेशावरून लाच स्विकारले असल्याचे पोलिसांना सांगितले. याप्रकरणी सिटीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तरुणावर प्राणघातक हल्ला, गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** त्या महिलेसोबत भांडण का करतो असे म्हणत सहा ते सात जणांच्या टोळक्याने मुनीर खान (रा.कैलासनगर, दादा कॉलनी ) यांना शिवीगाळ करून लोखंडी रॉडने मारहाण केली. मुनीर खान यांना शिवीगाळ करून रॉडने मारहाण करण्यात आल्याची घटना २७ मार्च रोजी घडली. त्यांच्या पत्नीने दिलेल्या तक्रारीवरून शेख जावेद, सिराज, सलमान, सोहेल, शेख ताहेर, हुसेन यांच्यासह एका महिलेविरूध्द जिन्सी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र Business Katta












# वाढत्या वाहनांना लगाम घालण्याची गरज



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**मुंबईत वाहनांची संख्या इतर शहरांच्या तुलनेत जास्त आहे. मुंबईत प्रति किलोमीटर ५३० चार चाकी वाहन आहेत. त्याचा वाहतुकीवर मोठा परीणाम होत आहे. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत होत आहे. गेल्या तीन वर्षात मुंबईतील चार चाकी वाहनांची घनता २३ टक्क्यांनी वाढली आहे. इतर कोणत्याही शहरांच्या मानाने मुंबईत वाहनांची संख्या अधिक आहे. मुंबईत चारचे प्रमाण दिल्लीच्या तीनपट आहे.**

एव्हढ्या मोठ्या संख्येने वाढलेल्या वाहनांमुळे पार्किंगचा प्रश्न जटिल झाला आहे. मुंबईत दुचाकी आणि चार चाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे आहे. त्या तुलनेत गाड्या पार्क करण्यासाठी फक्त १५ वाहनतळ असून त्यात ९ हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली असून त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. रस्त्यांवर असणाऱ्या अवैध पार्किंगमुळे शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. लहान रस्त्यांपासून पूर्व आणि पश्चिम दृदगती महामार्गावर सकाळ, दुपार, संध्याकाळ अशा कोणत्याही वेळेस प्रचंड वाहतूक कोंडी होते. ज्या ठिकाणी जायला १५ मिनिटे लागतात त्या ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे ३५ मिनिटे लागतात. मुंबई हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शहर असले तरी वाहतूक कोंडीचे शहर अशी मुंबईची नवी ओळख निर्माण होत आहे. वाढत्या वाहन संख्येसोबतच रस्त्यांवर कुठेही पार्क केलेली तसेच छोट्या रस्त्यांवर दुतर्फा पार्क केलेली वाहने कोंडीचे मोठे कारण ठरत आहे. मुंबईतील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी अधिकाधिक वाहन तळांची आवश्यकता आहे. सरकारने त्या दृष्टीने पावले टाकायला हवीत. वाढत्या वाहनांमुळे मुंबईत प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यावर्षी मुंबईतील हवा सर्वाधिक निकृष्ट श्रेणीत गणली गेली आहे. दिल्लीपेक्षाही मुंबईची हवा अधिक दूषित असल्याचा एक अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाने नुकताच जाहीर केला आहे. मुंबईतील हवा प्रदूषित असण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे मुंबईतील वाढती वाहनांची संख्या. जर वाहनांच्या संख्येत अशीच वाढ होऊ लागली तर मुंबई जी महाराष्ट्राची राजधानी आहे ती प्रदूषणाचीही राजधानी बनेल आणि लोकांना श्वास घेणे मुश्किल होईल. त्यामुळेच वाहनांच्या वाढत्या आळा घालणे अवश्यक आहे. जर मुंबईकरांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीतजास्त वापर केला तर ही समस्या सुटण्यास मदत होईल. सरकारनेही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. जर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल. वाहनाची संख्या कमी झाली की इंधन बचतही होईल आणि प्रदूषणालाही अटकाव होईल तसेच पार्किंगचा प्रश्नही सुटेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होणे ही काळाची गरज आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली की वाढत्या वाहनांना आपोआप आळा बसेल.



# रक्तात नाही विचारात भीम पाहिजे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जसजशी जयंती जवळ येत जाते तसतसे जयंती महोत्सवाची तयारी मोठ्या उत्सवात केली जाते. बँनर्स बनवणे, वर्गणी गोळा करणे, कार्यक्रमाची रूपरेषा ठरवणे, कार्यक्रमासाठी वक्ता, गायक यांच्या वेळा ठरवणे असे महत्त्वाचे कामे केली जातात. बौद्ध वस्तीतील पैसा गोळा करून बाबासाहेबांचे कार्यक्रम बौद्ध वस्तीमध्येच घेतले जातात. जयंतीनिमित्त प्रबोधन करण्यासाठी आलेल्या व्यक्ती व मनोरंजन करण्यासाठी आलेले बहुतांश गायक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मर्यादित करून त्यांची मांडणी मर्यादित व चुकीच्या पद्धतीने करतात. एकीकडे बाबासाहेबांचे विचार अंगीकारून त्यांची पेरणी संपूर्ण देशामध्ये करण्यासाठी एक वर्ग प्रामाणिकपणे काम करत असतो.**

बाबासाहेब आंबेडकर हे कोणत्याही जातीची वा धर्माची खाजगी संपत्ती नसून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ही राष्ट्रीय संपत्ती आहे. आणि म्हणून बाबासाहेबांचे विचार माणसांच्या मनामध्ये रुजवण्यासाठी विचाराने पेटलेला एक वर्ग अविरतपणे काम करत आहे. जयंती निमित्ताने या वर्गाला नाचणारे व जयंती वाजत गाजत धुमधडाक्यात साजरी करणारे लोक सहकारी करत नाहीत. किंवा त्यांच्या कार्याची दखल घेतली जात नाही. बऱ्याचशा जयंती मंडळ कार्यकर्त्यांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांवर चांगलं बोलणारा भडकाऊ बोलणारा, भडकवणारा वक्ता व गायक हवा असतो. परंतु बाबासाहेबांचे सत्य विचार सांगणारा बऱ्याच लोकांना कंटाळावा वाटतो. आणि म्हणून जयंती कार्यक्रमाच्या माध्यमातून सत्तर वर्षांमध्ये बाबासाहेब यांची वैचारिक पेरणी समाजामध्ये व्हायला पाहिजे होती ती न होता बाबासाहेब मर्यादित व धर्मात बंद करून त्यांची मांडणी केली जात आहे. बाबासाहेबांच्या नावे अनेक चुकीची माहिती सुद्धा पसरवू बाबासाहेबांचा नावाचा गैरवापर केला जात आहे. अनेक वक्ते अनेक गायक रक्तामध्ये भीम शोधत आहेत. एकीकडे हिंदू धर्मातील अंधश्रद्धा पाखंड यावरती स्टेजवरून विरोध करायचा आणि दुसरीकडे रक्तामध्ये भीम शोधून विज्ञानात सांगायचं या गोष्टी बुद्धीला व तर्काला पटणाऱ्या आहेत का ? याचा विचार कोणीही करत नाही. परंतु आमचाच बाबासाहेब, आमचेच संविधान, रक्तात बाबासाहेब पाहिजेत, बाबासाहेबांनी आमच्यासाठी हे केलं, बाबासाहेबांनी आमच्यासाठी ते केलं, असे वक्तव्य करून बाबासाहेबांच्या नावावर टाळ्या व पैसा गोळा करणाऱ्यांची संख्या वाढलेली आहे. लोकांना सुद्धा आनंदोत्सव असतो बाबासाहेब अंगामध्ये संचारलेले असतात आणि म्हणून चुकीच्या पद्धतीने का होईना भडकाऊ व मर्यादित बाबासाहेब ऐकण्यामध्ये त्यांना मजा व आनंद वाटते. आपण वर्षानुवर्ष असेच कृत्य करत आलो म्हणून बाबासाहेब आंबेडकर बौद्ध वस्तीतून गावामध्ये फक्त मिरवणुकीच्या माध्यमातून घेऊन गेलो. पण विचार मात्र अजून बौद्ध वस्तीमध्ये सुद्धा दिसत नाहीत. ही शोकांतिका आहे मुळात सर्वच बौद्ध वस्तीमध्ये बाबासाहेबांचे विचार नाहीत आणि गावामध्ये बौद्धेतर लोक बाबासाहेबांचे विचाराला मानतच नाहीत असे म्हणणे चुकीचे आहे. परंतु बाबासाहेबांचा वैचारिक स्वीकार करणाऱ्या लोकांची संख्या खूप कमी आहे. आणि बहुतांश लोक बाबासाहेबांना मर्यादित करून त्यांच्या जयंती दिवशी फक्त जल्लोष करतात. परंतु बाबासाहेबांना रक्तात शोधण्यापेक्षा विचारात जर शोधले तर जयंती साजरी करण्याचे सार्थक होईल, व घराघरांमध्ये बाबासाहेब पोहोचतील. बहुजन समाजातील लोकांनी बाबासाहेब वाचलेच नाहीत किंवा बाबासाहेबांचा फोटो ते घरामध्ये लावतच नाहीत अशी वक्तव्य भीम जयंतीच्या मंचावरून केली जातात. परंतु हे अर्ध सत्य आहे बौद्ध सोडून इतर लोक बाबासाहेब आंबेडकर यांना वाचत नाहीत यांचे फोटो घरामध्ये नाहीत हे मान्य आहे परंतु दुसरीकडे त्या लोकांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले,जिजाऊ, अहिल्याबाई होळकर,संत गाडगेबाबा, संत तुकाराम महाराज, अशा कोणत्याही परिवर्तनकारी संत व महापुरुषांना फारसे वाचले नाही किंवा यांचे सुद्धा फोटो त्यांनी घरामध्ये लावले नाहीत. हे ही सत्य आहे. याचे कारण आहे परिवर्तनकारी व्यवस्था न मानणाऱ्या लोकांनी या लोकांपर्यंत महापुरुषांचे विचार, संतांचे विचार पोहोचूच नाही अशी व्यवस्था निर्माण केली. आणि म्हणून अजूनही लोकांना छत्रपती शिवाजी महाराज किंवा बहुजन समाजातील इतर महापुरुषांनी संत यांचे विचारही समजले नाहीत. आणि त्यांनी ते कधी वाचलेही नाहीत कारण व्यवस्थेने तशी परिस्थिती निर्माण केलेली आहे. संविधान विरोधी व विषमतेवर आधारित असलेली व्यवस्था आजही महापुरुषांचे विचार घराघरात पोहोचवण्यासाठी प्रयत्न करत नाही हे सत्य आहे. आणि हेही सत्य आहे तर बौद्ध लोकांचे मत विचार इतर बहुजन समाजातील लोक ऐकण्यासाठी समजण्यासाठी टाळाटाळ करण्याचा प्रयत्न करतात. परंतु जर विषयाचे मांडणी वैचारिक केली तर आपण बाबासाहेबांचे विचार त्यांना सुद्धा पटवून देऊ शकतो. परंतु हे न करता काही लोकांनी बाबासाहेब स्वीकारलेच नाहीत म्हणून द्वेष भावनेने बोलून मग पुढे बाबासाहेब बौद्धांना सांगितले जातात .हे वैचारिक बाबासाहेब सांगण्याचे मुळीच लक्षन नाही. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रपुरुष होते, त्यांनी संबंध देशाचा विचार केला, शेतकरी शेतमजूर विद्यार्थी महिला कामगार यांचे नेतृत्वच केले नाही, तर त्यांना न्याय मिळवून दिला. या गोष्टीवर मात्र कोणी भर देत नाही. सर्व समावेशक उदाहरणे देऊन जास्त स्पष्टीकरण देण्याच्या भानगडीत न पडता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग केला, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धम्माचा स्वीकार केला, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आमच्यासाठी संविधान लिहिले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला मंदिरात जाण्यासाठी परवानगी दिली, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळ्यावर आम्हाला पाणी पिण्याची संधी दिली, एवढ्यावरच मुद्यांवर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार सांगितले जातात. आणि त्यातही अनेक बाबींमध्ये त्यांचे कार्य फक्त जात मर्यादित व धर्म मर्यादित होते यावरच बोलले जाते. म्हणून जयंती निमित्ताने जे कार्यक्रम होतात त्या कार्यक्रमाच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना मर्यादित केल्याचे काम केले जाते. आणि एकदा जयंती संपली की वर्षभर मात्र डॉक्टर बाबासाहेबांचे विचार, डॉक्टर बाबासाहेबांचे कार्य, देशात बाबासाहेबांच्या विचारानुसार भारतीय संविधानानुसार काम होतात की नाही, सामाजिक न्याय मिळतो की नाही, याविषयी मात्र कोणीही समोर येत नाही किंवा बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याची जबाबदारी स्वीकारत नाही. परंतु वरील सांगितलेल्या प्रमाणे जो एक गट आहे तो बाबासाहेब आंबेडकरांचे विचारांची पेरणी हा सतत करत असतो. 14 एप्रिल आली म्हणून नाचायचे नसते आणि सहा डिसेंबर आला म्हणून रडायचे नसते हे डोळ्यासमोर ठेवून अविरतपणे देशात घडत असलेल्या घटना बाबासाहेबांच्या विचाराचे विरोधात असल्यास वेगवेगळ्या माध्यमांतून त्या चुकीच्या कशा आहेत हे सांगण्याचा प्रयत्न करतात. काही घटना संविधानाला अपेक्षित घडल्यास यामागे संविधानाचा व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या त्यागाचा कसा सहभाग आहे. हे सुद्धा समजून सांगतात. थोडक्यात काय तर ते 14 एप्रिल असो की सहा डिसेंबर बाबासाहेबांचे कार्य व विचार समाजात सारख्याच पद्धतीने पेरण्याचा प्रयत्न करतात. परंतु अशा लोकांना प्रसिद्धी दिली जात नाही, समाजातून सहकार्य केले जात नाही. आणि म्हणून जयंती कार्यक्रमाला विचार मंचावरून रक्तातल्या भीमाची गोष्ट केली जाते. परंतु विचाराच्या भिमाची गोष्ट केली जात नाही. जर विचाराच्या भीमाची गोष्ट केली तर विचाराप्रमाणे कृती करावी लागते. आणि बरेचसे गायक व वक्ते हे विचारा प्रती कृतीशील नाहीत. जसे बाबासाहेबांनी सांगितलेल्या शिकवणीनुसार ते स्वतः वागत नाहीत परंतु पैसा मिळते म्हणून मिळते म्हणून लोकांचे मनोरंजन करण्याचा प्रयत्न केला जातो. बरेचसे लोक कार्यक्रम सुरू होण्याअगोदर आणि कार्यक्रम संपल्यावर ती दारू पितात, बरेचसे लोक हजारो लाखो रुपये घेऊनही कधी कोणाच्या शिक्षणाला, कोणाच्या आरोग्यासाठी एक रुपया खर्च करत नाहीत. बरेचसे लोक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला सगळं फुकट दिले हे सांगण्याची हजारो लाखो रुपये आकारतात. तर याला विचार म्हणत नाहीत किंवा वैचारिकता म्हणत नाहीत. समाजातील अनेक लोक समाजामध्ये वावरताना खोटे बोलणे, लोकांची फसवणूक करण्यासारखे प्रकार करत असतात. आणि म्हणून विचारावर जर बोललेत तर विचाराची शहानिशा होऊ शकते. म्हणून रक्ताचे नाव घेऊन लोकांना एका दिवसापुरते का होईना पण भावनिक बनवले जाते आणि त्यावर पोट भरले जाते. हे थांबले पाहिजेत आणि रक्तात भीम शोधण्यापेक्षा विचारात शोधला पाहिजे. तरच समाजामध्ये व देशामध्ये विचार कर्तुत्वातुन बाबासाहेबांच्या कार्याची व विचाराची पेरणी होईल. व प्रत्येक नागरिकांना बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची जाणीव होईल.



# जात जनगणना का आवश्यक आहे ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**बिहार सरकारने जात जनगणना करण्याची घोषणा केल्यानंतर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातही ओबीसी जनगणना करणार असल्याची मोठी घोषण केली.बिहारने जातीय जनगणनेची घोषणा करताच केंद्रावरही दबाव वाढू लागला आहे, मात्र केंद्र सरकार त्यास अनुकूल नाही. म्हणजेच १९31 च्या जनगणनेच्या आधारे देशाची लोकसंख्या प्रत्येक प्रकारे मोजली जात आहे. आपल्या देशात जाती आणि त्यांच्या पोटजातींचे विविध प्रकार असले तरी त्यांची संख्या किती आहे , कोणत्या जातीत किती लोक आहेत , त्यांची आर्थिक स्थिती काय आहे , हे सध्या निश्चित नाही.**

सन १९३१ पासून आजतागायत हा मुद्दा आपल्या देशात विकासाच्या मार्गात अडथळा ठरला आहे. ज्यामध्ये सर्वाधिक वाद मागासवर्गीयांचा आहे. या वर्गाची संख्या बळकट करण्यासाठी , विविध राज्ये केंद्रावर दबाव आणतात , कारण राजकीय पक्ष आपल्या बाजूने मते एकत्रित करण्यासाठी जातीय अस्मितेचा सर्वाधिक आधार घेतात ,याशिवाय सर्व जातींच्या उत्थानासाठी आणि त्यांच्या न्याय्य हक्कांसाठीही ते आवश्यक आहे. पण केंद्रात सत्तेत असलेला पक्ष प्रत्येक वेळी कुठली तरी सबब पुढे करून टाळतो.बिहार आणि उत्तर प्रदेश जात जनगणनेबाबत सर्वाधिक उत्सुक आहेत. 'जेवढी संख्या जास्त, तेवढा वाटा जास्त' असा नाराही लावला जातो. सध्या उत्तर प्रदेशात फक्त भाजपचे सरकार आहे, त्यामुळे केंद्रापासून फारकत घेऊन ही मागणी लावून धरण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही , मात्र बिहार सरकारने राज्यात जात जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. कारण तिथे युतीचे सरकार आहे. पहिल्या सर्वपक्षीय बैठकीत आणि नंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीत सर्वकाही ठरविल्यानंतर , कर्नाटक मॉडेलच्या धर्तीवर बिहार राज्यात जात गणना करणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. या भव्य मोहिमेवर सरकारी तिजोरीतून ५०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून, या मोहिमेमध्ये राज्यातील १४ कोटी लोकसंख्येतील जात, पोटजाती, धर्म आणि समुदाय तसेच त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचे ९ महिन्यांत मूल्यांकन केले जाणार आहे. मोठी गोष्ट म्हणजे नितीशकुमारांच्या या निर्णयाला भाजपनेही पाठिंबा देणे भाग पडलेले दिसते. आता यासाठी भाजप हायकमांडची स्थिती काय असेल, हे येणारा काळच ठरवेल, भारतात दर १०वर्षांनी एकदा जनगणना केली जाते . यामुळे सरकारला विकास आराखडे तयार करण्यास मदत होते. कोणत्या विभागाला किती वाटा मिळाला , कोणाच्या वाट्यापासून वंचित राहिले, या सर्व गोष्टी माहीत आहेत. अनेक नेत्यांनी मागणी केली आहे की, जेव्हा देशात जनगणना केली जाते तेव्हा या काळात लोकांना त्यांची जात देखील विचारली जावी. यावरून आपल्याला देशाची लोकसंख्या तर कळेलच, पण देशात कोणत्या जातीचे किती लोक राहतात याचीही माहिती मिळेल. सोप्या भाषेत सांगायचे तर जातीच्या आधारे लोकांची गणना करणे याला जात जनगणना म्हणतात.

**जनगणनेत कोणी अडथळे आणले ?**

२०१० मध्ये भाजपची सत्ता नव्हती. भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे संसदेत जातनिहाय जनगणनेच्या मुद्द्यावरून वाद घालत होते. ओबीसी जातींची मोजणी झाली नाही तर त्यांना न्याय द्यायला अजून १० वर्षे लागतील, असे ते सांगत होते . यानंतर भाजपची सत्ता आल्यावर आणि वेळेनुसार १० वर्षांनंतर २०२१ मध्ये जनगणना होणार होती , मात्र ती झाली नाही , तेव्हा २०२१ ची जनगणना यंदा संसदेत भाजपला विचारण्यात आली. जातीच्या आधारे जनगणना होणार की नाही ? नाही तर का नाही ? सरकारचे लेखी उत्तर आले. म्हणाले की फक्त एस.सी.फक्त एसटीची मोजणी केली जाईल. म्हणजे ओबीसी जाती मोजण्याची कोणतीही योजना नाही. याचा अर्थ केंद्रात कोणताही पक्ष सत्तेत असला तरी जातगणनेबाबत नाखूष आहे. हे पक्ष विरोधात असताना जात जनगणनेला मुद्दा बनवतात.

**१९३१ मध्ये जात जनगणना झाली**

भारतातील शेवटची जात जनगणना ब्रिटिश राजवटीत १९३१ मध्ये झाली होती. यानंतर १९४१मध्ये जनगणनाही झाली परंतु आकडेवारी सादर करण्यात आली नाही. त्यानंतर पुढील जनगणनेपूर्वी देश स्वतंत्र झाला होता. म्हणजे आता ही जनगणना १९५१ मध्ये झाली होती , मात्र या जनगणनेत फक्त अनुसूचित जाती आणि जमातींचीच गणना होते. म्हणजे १९५१मध्ये ब्रिटिशांच्या जनगणना धोरणात बदल झाला होता जो आजही कमी-अधिक प्रमाणात चालू आहे. या जनगणनेपूर्वी, १९५० साली घटना अंमलात येताच एस सी आणि एस टी साठी आरक्षण सुरू झाले , काही वर्षे उलटली आणि मागासवर्गीयांमधूनही आरक्षणाची मागणी जोर धरू लागली.

तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी १९५३ मध्ये काका कालेलकर आयोगाची स्थापना आरक्षणाच्या दृष्टीने मागासवर्गीयांची व्याख्या कशी करावी आणि या वर्गाची उन्नती कशी करावी यासाठी १९५३ मध्ये स्थापन केली होती. काका कालेलकर आयोगाने १९३१ च्या जनगणनेला आधार मानून मागासवर्गीयांची गणना केली. काका कालेलकर आयोगाच्या सदस्यांमध्ये ही गणना जातीच्या आधारावर करायची की आर्थिक आधारावर, असा वाद सुरू असला तरी, हा आयोग केवळ इतिहासाचा कागद भरण्यापुरता मर्यादित राहिला.

१९७८मध्ये देशात मोरारजी देसाईंच्या जनता पक्षाचं सरकार होतं. या सरकारने बीपी मंडल यांच्या अध्यक्षतेखाली मागास आयोगाची स्थापना केली. पण मंडल आयोगाने डिसेंबर १९८० मध्ये अहवाल सादर केला तोपर्यंत जनता पक्षाचे सरकार गेले होते. मंडल आयोगाने १९३१ च्या जनगणनेच्या आधारे अधिक मागासलेल्या जातींची ओळख पटवली . एकूण लोकसंख्येपैकी ५२ टक्के लोक मागासवर्गीय मानले जात होते. सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मागासवर्गीयांना २७ टक्के आरक्षण द्यावे, असेही मंडल आयोगाकडून सांगण्यात आले . मात्र, मंडल आयोगाच्या शिफारशींकडे पुढील ९ वर्षे लक्ष दिले गेले नाही . पण १९९० मध्ये व्हीपी सिंग यांच्या सरकारने मंडल आयोगाच्या शिफारशी लागू केल्या.२७ टक्के आरक्षणाची मागणी करण्यात आली. व्हीपी सिंह यांच्या या निर्णयानंतर गदारोळ झाला , प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले.त्यानंतर १९९२ मध्ये इंद्र साहनी यांनी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाची पाळी आली... ज्यामध्ये आरक्षण योग्य मानले गेले पण कमाल मर्यादा ५० टक्के निश्चित करण्यात आली . २००६ मध्ये.. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री अर्जुन सिंह यांनी मंडळ भाग 2 सुरू केला आणि या मंडल आयोगाची आणखी एक शिफारस लागू करण्यात आली ज्यामध्ये सरकारी शैक्षणिक संस्था जसे की विद्यापीठे , आयआयटी, आयआयएम, वैद्यकीय महाविद्यालयातही सरकारी नोकऱ्या. मागासवर्गीयांना आरक्षण देण्यावर शिक्कामोर्तब झाले. यावेळीही वाद झाला मात्र सरकार ठाम राहिल्याने त्याची अंमलबजावणी झाली. 2010 मध्ये काँग्रेसचे सरकार होते आणि देशात जातीवर आधारित जनगणनेची मागणी जोर धरू लागलीहोती लालू प्रसाद यादव, शरद पवार, मुलायमसिंह यादव, गोपीनाथ मुंडे यांसारख्या नेत्यांनी ही मागणी जोरकसपणे मांडली असली तरी काँग्रेस त्यास अनुकूल नव्हती. मार्च २०११ मध्ये तत्कालीन अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी जातीच्या जनगणनेवर भाष्य केले आणि या जनगणनेत काम करणाऱ्यांना असे प्रशिक्षण किंवा अनुभव नसल्याचे नमूद केले. मात्र, लालूंसारख्या मित्रपक्षांच्या दबावामुळे काँग्रेसला जातीय गणनेचा विचार करावा लागला. प्रणव मुखर्जी यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन करण्यात आली, ज्यामध्ये जनगणनेच्या बाजूने सूचना देण्यात आल्या. या जनगणनेला सामाजिक म्हणजेच आर्थिक आणि जाती संवेदना असे नाव देण्यात आले. सामाजिक काम पूर्ण करण्यासाठी काँग्रेसने ४८०० कोटी रुपये खर्च केले . जिल्हानिहाय मागास जातींची मोजणी करण्यात आली आणि त्याची आकडेवारी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाला देण्यात आली. त्यानंतर अनेक वर्षे या डेटाबद्दल बोलले गेले नाही.

जेव्हा सरकार बदलले तेव्हा काही गोंधळ झाला आणि जात जनगणनेच्या आकडेवारीचे वर्गीकरण करण्यासाठी एक तज्ञ गट तयार करण्यात आला. या गटाने अहवाल दिला की नाही , त्याची माहिती अद्याप आलेली नाही. एकूणच मोदी सरकारनेही जातीची आकडेवारी जाहीर करणे योग्य मानले नाही.

**केंद्र सरकार जात जनगणनेला का घाबरते ?**

समजा जातीची जनगणना झाली, तर आत्तापर्यंतच्या माहितीत उपलब्ध आकडेवारी , ती वर किंवा खाली असण्याची शक्यता आहे. उदा., ओबीसींची लोकसंख्या ५२ टक्क्यांवरून कमी झाली, तर नवा वाद निर्माण होऊ शकतो, आणि समजा ही टक्केवारी वाढली, जी बरीचशी शक्यता आहे, तर सत्ता आणि संसाधनांच्या वाटणीच्या अधिक मागण्या होतील. सरकारला याची भीती वाटत असावी. आदिवासी आणि दलितांच्या अंदाजात कोणताही बदल होणार नाही, कारण त्यांची गणना प्रत्येक जनगणनेमध्ये केली जाते , केवळ उच्च जाती आणि ओबीसी यांच्यासाठीच जातीच्या जनगणनेतील टक्केवारीत वाढ किंवा घट होण्यास वाव आहे.



भाजपचा प्रवेश आता उच्चवर्णीयांमध्ये अधिक आहे. आरक्षणाची व्याप्ती वाढली तर उच्चवर्णीय आंदोलन करतील आणि सरकारच्या अडचणी वाढतील.

**प्रादेशिक पक्ष काय म्हणतात ?**

प्रादेशिक पक्षांमध्ये, समाजवादी पक्ष, राष्ट्रीय जनता दल आणि राष्ट्रवादी काँग्रेससह डझनहून अधिक पक्षांनी भाजपने ओबीसींची नेमकी संख्या उघड करावी आणि त्यानंतर ५०टक्के आरक्षणाची मर्यादा वाढवावी अशी मागणी केली आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की जर योग्य जनगणनेमुळे कोणतीही हानी झाली नाही तर सर्व जाती आणि त्यांची स्थिती जाणून घेतली जाईल आणि त्यांना आरक्षण , समाजातील स्थान आणि इतर संसाधनांमध्ये त्यांचे पूर्ण अधिकार मिळतील .

# मैत्री एपिलेप्सीशी



संध्या सिनकर
संपर्क क्र. 9920740645

आधुनिक केसरी

**मैत्री एपिलेप्सीशी या पुस्तकातून एपिलेप्सी या आजाराविषयी सविस्तर माहिती मिळते. त्याचबरोबर व्याधीचा स्वीकार, त्यावरील उपचार व औषधांशी मैत्री करायला हवी हे समजतं. हे पुस्तक यशोदा वाकणकर यांचे आत्मकथन आहे. वयाच्या सातव्या वर्षी एपिलेप्सी त्यांच्या आयुष्यात आली. तेव्हापासून एपिलेप्सीसहित केलेला त्यांचा प्रवास पुस्तकात छान उतरला आहे. नंतर त्यांची ब्रेन सर्जरी झाल्यावर त्या एपिलेप्सीच्या त्रासातून मुक्त झाल्या. ते सर्व अनुभव त्यांनी शब्दबध्द केले आहेत.**

हा प्रवास फक्त एपिलेप्सीचा नाही तो नात्यांचा, माणसावरच्या विश्वासाचा आणि माणसं जोडण्याचाही आहे. यशोदा वाकणकर ही सुप्रसिद्ध समाजसेवक, लेखक डॉ. अनिल व डॉ. अनिता अवचट यांची मुलगी. समाजसेवेचा व प्रगल्भ विचारांचा वारसा त्यांना घरातूनच मिळाला आहे. त्यांची संवेदनाशीलता व सहृदयता पुस्तक वाचताना जाणवते. त्यांनी एपिलेप्सीग्रस्त व्यक्तींना व त्यांच्या कुटुंबीयांना साहाय्य करण्यासाठी संवेदना ह्या स्वमदतगटाची स्थापना केली. स्वमदत गटातून समुपदेशन, एपिलेप्सीविषयी जनजागृती, रुग्णांना मोफत औषधे, त्यांच्या लग्नासाठी वधू वर सूचक मंडळ व त्यांना रोजगार मिळावा म्हणून रोजगार मेळावे असे अनेक उपक्रम त्यांनी सुरू केले. आता संस्थेच्या अठरा वर्षाच्या प्रवासात अनेक कार्यकर्त्यांची खंबीर फळी त्यांच्या बरोबर आहे. यशोदाजी म्हणतात त्यांचा सर्व प्रवास सांगण्याचा उद्देश हा एपिलेप्सीग्रस्त व्यक्तींना, कुटुंबांना सहाय्य करणे व त्यांना त्यातून बाहेर पडायला मदत करणं हा आहे. यशोदाना लेखन, चित्रकला, ओरोगामी, गाणे, प्रवास, स्वयंपाक अशा अनेक गोष्टीत गती आहे. त्या आनंदी व सकारात्मक दृष्टिकोनातून जीवनाकडे बघतात. त्यांना लहानपणीच एपिलेप्सीचा त्रास सुरू झाला असला तरी घरातलं वातावरण नेहमी सकारात्मक असे. आई-वडिलांनी त्यांना कुठल्याही गोष्टीचा आनंद घ्यायला शिकवले. काही बंधने असली तरी गाण्याचा क्लास, चित्र काढणं, शाळा सगळं जोरात सुरू असे. घरात आनंदी वातावरण असे. डॉ. अनिल व डॉ. अनिता अवचट यांच्यासारखे पालक लाभल्याने त्यांनी यशोदाजींचा एपिलेप्सीचा अवघड प्रवास सोपा करून दिला. त्यांनी यशोदाजीना नॉर्मल मुली सारखंच वाढवल. ते सांगत काय करता येत नाही त्यापेक्षा काय करता येते याकडे लक्ष दे. त्याही आयुष्य भरभरून जगणाऱ्या व आनंदी आहेत. यशोदाजी कायम सांगतात की आजारासंबंधी लपवू नका. सगळ्यांना मोकळेपणाने सांगा. या व्याधी विषयीचा सोशल स्टीग्मा प्रचंड प्रमाणात आहे. त्यामुळे एपिलेप्सी मित्र स्वतःला कमी लेखतात. अनेकदा पालकच घरात असं वातावरण निर्माण करतात. आपल्या समाजात काही व्याधी या अप्रतिष्ठित ठरवल्या जातात. एखाद्याला फिट आली तर ती बघणं भीतीदायक वाटू शकते. समाज त्या आजाराशी बट्टा किंवा कलंक म्हणजेच सोशल स्टिग्मा जोडतो. यशोदाजीनी त्यांच्या गटातल्या एपिलेप्सीचा इतिहास असलेल्या एका मुलीची गोष्ट सांगितली आहे. ही मुलगी चांगली शिकलेली. या मुलीसाठी तिचे आई-वडील नोकरी शोधत होते. पण वारंवार नकार मिळत होता. ते कुटुंब म्हणत होते की नोकरी एपिलेप्सीच्या इतिहासामुळे मिळत नाही. ही मुलगी भरपूर शिकलेली होती. तरीही नोकरी मिळत नव्हती. तिने ज्या कंपनीत इंटरव्यू दिले तिथल्या एका गृहस्थांबरोबर योगायोगाने लेखिकेचे बोलणं झालं.

तेव्हा ते म्हणाले की या मुलीला नोकरी मिळाली नाही कारण तिच्यामध्ये आत्मविश्वासाचा अभाव व प्रचंड न्यूनगंड आहे. त्यामुळे ती प्रश्नांची उत्तरे नीट देऊ शकली नाही. लहानपणापासून मनावर बिंबवलेल्या सोशल स्टिग्मामुळे हे घडतं. यशोदाजीना प्रवासाची आवड आहे. अगदी हिमालयातल्या प्रवासाला गेलेल्या असतानाही त्यांनी एपिलेप्सी बद्दल माहिती सांगून मदतीचा हात पुढे केला आहे. रोजचे जीवन अधिक समरसून, आनंदाने जगण्याचा एक वेगळा दृष्टिकोन त्यांच्याकडे आहे. तो आपल्यालाही शिकावसा वाटतो. त्यांना आलेले एपिलेप्सी मित्रांचे व पालकांचे विविध अनुभव वाचताना मन भरून येते. एक बाई त्यांच्या संस्थेत यायची. तिच्या दोन मुलांना फिट्स येत.

मोठी मुलगी डायलिसिस वर होती. सगळ्यांचे उपचार चालू होते. दोन्ही मुलांचा बुध्यांक कमी होता. बहीणही अधून मधून हिस्टेरीक होत असे. नवऱ्याचा पण बुध्यांक कमी होता. त्यांचे फसवून लग्न केले होते. त्यालाही फिट्स येत. आता तो पक्षाघाताने अंथरुणाला खिळून होता. बाई एका खानावळीत पोळ्यांचे काम करत. त्यांची ही परिस्थिती पाहून संवेदना फाउंडेशन तर्फे तिची दोन्ही मुलं व नवरा यांना औषधांची मदत सुरू केली. त्यामुळे तिला मोठीच मदत झाली. संवेदना संस्थेच्या सर्वांना त्या खूप दुवा देतात. यशोदाजी म्हणतात अशा उदाहरणामुळे आपण भानावर राहतो. जगातील वास्तविकता समजते. दाहकता दिसते. आपल्यालाही जाणवत अनेक सुख असतानाही आपण कुरकुर करतो. भपकेबाज गोष्टी किती वरवरच्या आहेत. याची जाणीव होते. एपिलेप्सीशी निगडीत पैलुंवर अविरत काम करताना त्यानी क्लीनिकल सायकॉलॉजी मध्ये एम ए केलं. बेंगलोर युनिव्हर्सिटीतून डिप्लोमा इन एपिलेप्सी केअर केला. यशोदाजींची शैली साधी, ओघवती व प्रसन्न आहे. पुस्तकात त्यांचा एपिलेप्सी बरोबरचा प्रवास हळूहळू उलगडत जातो. त्याचबरोबर इतर एपिलेप्सी मित्रांच्या संक्षिप्त कथाही आहेत. अनेक पालकांचे अनुभवही आहेत. हे सगळे अनुभव आपल्या जाणिवेच्या कक्षा रुंद करतात व आपण माणूस म्हणून अधिक समृद्ध होतो.



# मग शरद पवारांच्या राजकीय भूमिका का खटकू नयेत ?



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा व माजी केंद्रीय कृषीमंत्री खा.शरद पवार यांचे राजकारण व त्यांनी घेतलेल्या भूमिकांमुळे ते नेहमीच चर्चेत येत असतात.आज शरद पवार हे राजकारणातील एक अनुभवी आणि जेष्ठ नेते म्हणून त्यांच्या कडे पाहिले जात असते.त्यांच्या राजकीय भूमिकां मुळे कधी कोणती राजकीय गुगली टाकली जाईल आणि राजकीय बदलाचे वारे कधी परिवर्तीत केले जाईल.हा भरवसा नसतोच नसतो.राजकीय स्थित्यंतरे घडवून आणण्यात शरद पवारांचा हातखंडा कुणीच पकडू शकत नाही.असे असले तरी त्यांनी घेतलेल्या अनेक भूमिकांवर सुद्धा संशय हे व्यक्त केले जात असतात.**

नक्की शरद पवारांच्या मनात चाललंय तरी काय ? शरद पवारांनी अशी भूमिका घेण्या मागचा नेमका हेतू कोणता ? अशी संभ्रमावस्था सुद्धा जनतेमध्येच नव्हे तर राजकीय पक्षांमध्ये सुद्धा दिसुन येत असते. मुळातच शरद पवारांचे राजकारण हे फोडा फोडीचे राजकारणच आहे. दुसऱ्यांचे घर फोडणारे राजकारण आहे.असे राजकारण शरद पवार यांच्या कडुन केले जात असते. असे सुद्धा म्हटले जात असते. त्यांच्यावर असे अनेक आरोप सुद्धा होत असतातच. एकंदरीत शरद पवार यांच्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीकडे पाहिले तर राजकीय दृष्टया ते राजकारणात यशस्वी झालेले नेते होय. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा प्रयोग घडवुन आणण्यात मोलाचा वाटा हा शरद पवारांचा आहे. त्यांनाच तर महाविकास आघाडीचे शिल्पकार सुद्धा म्हटले जाते. परंतु ह्याच महाविकास आघाडीत सुद्धा शरद पवारांच्या भूमिकांमुळे धुसफूस होऊ शकते.शरद पवार हे जेष्ठ नेते असले तरी त्यांनी घेतलेल्या भूमिका खटकू शकतात.लोकांना त्या का खटकू नयेत ? आजच्या परिस्थितीत शरद पवार हाच चेहरा भाजपच्या विरोधात सक्षमपणे उभा राहू शकतो.असा विश्वासच लोकांकडून व्यक्त केला जात असतो.परंतू तोच विश्वास कायम राहिलच असे ही सांगता येणारे नाही.शरद पवार घेत असलेल्या भूमिका नागालँड मध्ये भाजपला दिलेल्या पाठींब्या मुळे शरद पवारांच्या विश्वसार्हतेवर सुद्धा प्रश्न चिन्ह उपस्थित राहू शकते.लोकं तुमच्या कडून ज्या अपेक्षा धरून बसलेली आहेत.त्या अपेक्षांचा जर असा अपेक्षा भंग होणार असेल तर लोकांनी तरी शरद पवारांच्या राजकारणावर विश्वास ठेवायचा की नाही ? असा प्रश्न उपस्थित राहिला आहे. सोईनुसार, तडजोडी नुसार राजकीय नेते राजकारण करत असताना आज ही तेच सुरू आहे. परंतु एखादा पक्ष सत्तेत आल्यानंतर सत्तेचा दुरुपयोग करून सर्वच यंत्रणा स्वतःच्या ताब्यात घेऊन हुकूमशाही निर्माण करत असेल असे इथल्या विरोधी पक्षांना वाटत असेल तर अशा सर्व विरोधी पक्षांची भूमिका सुद्धा आक्रमक स्वरूपाची येणे आवश्यक आहे. त्यास विरोध करणारी विरोधी पक्षांची भूमिका त्यास पायबंद घालण्यासाठी तयार असली पाहिजे.परंतु असे न करता सत्तेतील लोकांनाच अजून मजबूत करणाऱ्या भूमिका घेतल्या जाणार असतील तर हे राजकारणच जनतेच्या फायद्याचे नसेल. स्थानिक मुद्दा लक्षात घेऊन तिथल्या मुद्यांना समजून घेऊन शिवाय हा पाठींबा भाजप ला नसून मुख्यमंत्र्यांना दिला आहे.असे म्हटले जात आहे.असे केल्याने जणू आता राष्ट्रवादी मुळे नागालँडच्या समस्या सुटणारच आहेत. इथले मुख्यमंत्री आणि भाजपला राष्ट्रवादीच्या मदतीची आवश्यकताच भासत असल्याने ही भूमिका घेतल्याचेच भासविले जात आहे. परंतु अशा भूमिका घेतल्या जातात तेव्हा कुछ तो गडबड है असेच म्हणावे लागेल. एकीकडे भाजपच्या विरोधात शड्डू ठोकायचा आणि दुसरीकडे त्यांच्याच सत्तेस पाठींबा द्यायचा. हे दुटप्पी पणाचे राजकारण भाजपला सक्षमपणे विरोध करणारे नाहीच. भाजपा ही लोकशाही विरोधी भूमिका घेत आहे. भाजप सत्तेचा दुरुपयोग करत आहे.अशी आरोळी वारंवार राष्ट्रवादी हा पक्ष करत असतो. सर्व पक्षांनी भाजपच्या ह्या हुकूमशाहीच्या विरोधात एकत्र आले पाहिजे, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस सातत्याने मांडत असतो. परंतु राष्ट्रवादीकडूनच भाजपच्या मांडीला मांडी लावली जात असते. हे असे का ? राजकारणातील दांडगा अनुभव असलेले शरद पवार जेव्हा पावसात भिजून भाषण करतात तेव्हा ते सर्वानाच आवडतात. ८२ वर्षाचा तरुण योद्धा म्हणून त्यांचे कौतुक सुद्धा सर्वत्र झाले. शरद पवार यांच्या कडे तरुणाई विशेष करून आकर्षित झाली. पावसातील ही सभा गाजली अन महाराष्ट्रातील राजकारण बदलले. मतांसाठी पावसात भिजणारे शरद पवार अशी सुद्धा टीका टिप्पणी झाली. शरद पवार काय करू शकतात हे पावसातल्या सभेने तर दाखवून दिलेले आहेच. शिवाय ज्यांच्या विरोधात सर्व पक्षीय नेत्यांनी एकत्र येण्याची गरज आहे.अशा वेळी मात्र शरद पवारांच्या राजकीय भूमिका ह्या भाजपच्या बाजूनेच जाऊ लागलेल्या आहेत. भाजपा देशाला धोकादायक आहे असे सांगण्यासाठी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते पदाधिकारी व नेते मंडळी अगदी जीवाचा आकांड तांडव करत आहेत. तेच आकांड तांडव करणाऱ्याना सुद्धा शरद पवारांच्या भूमिकेमुळं नरमाईची भूमिका घ्यावी लागत असेल ही. पक्षाचे सर्वेसर्वा जर भाजपलाच पाठिंबा देत असतील तर जो लढा



भाजपाच्या विरोधात उभारला जात आहे.तो लढा पुढे जाईल तरी कसा ?

भाजप हा पक्ष देशात लोकशाही धोक्यात आणत आहे.हे सरकार हुकूमशाहीचे आहे, असे वारंवार भाजप च्या विरोधात बोलले जात आहे. जे पी नड्डा ने या देशात भाजपा पक्षच शिल्लक राहिल.इथले प्रादेशिक पक्ष संपविण्यास निघालेली लोकं जेव्हा अशा पद्धतीची वक्तव्य करतात तेव्हा हे लोकशाहीस भयानकच आहे, असे हे सर्व घडत असताना विरोधकाना ही लोकशाही आपली नाही, इथे लोकशाहीचा खून होऊ लागला आहे, असे वाटू लागलेले आहे. परंतु भाजपच्या विरोधात जी आक्रमकता दिसायला हवी ती मात्र कुठेच दिसत नाही. आज महाराष्ट्रात गचाळ स्वरूपाचे राजकारण सुरू आहे. भाजपच्या विरोधात आक्रमक भूमिका घेण्याचे काम उद्धव ठाकरे आणि त्यांची सेना करत आहे. घर फुटते तेव्हा कशी वाताहत होते. हे उद्धव ठाकरे यांना या सर्व परिस्थितीचा अनुभव येतच आहे.राष्ट्रवादी फुटिला जेव्हा सुरुवात होईल तेव्हा नक्कीच घरफूटी काय असते याचा अंदाज नक्की राष्ट्रवादीच्या नेत्यांना येऊ शकतो.त्या पहाटेच्या शपथ विधी वरून तर राष्ट्रवादी नक्की काय आहे. याची सत्यता समोर येतच आहे. हा डाव सुद्धा शरद पवारांचाच होता, अशी चर्चा रंगलीच होती. खरं आणि खोटं काय हे बाहेर येतच आहे. देवेंद्र फडणवीस यांना जे बोलायचे होते ते तर बोलून गेले ही. आता खरं खोटे हे जनताच ठरवेल. परंतू ज्यांच्या विरोधात ही राष्ट्रवादी एकीकडे बंडाची भूमिका घेऊन उभी असते तीच राष्ट्रवादी दुसरीकडे मात्र थंडाईची भूमिका घेत असते तरी का ? आज उद्धव ठाकरेंच्या भूमिका दिवसेंदिवस आक्रमक होत आहेत. ते भूमिका अधिकच कठोरपणे मांडताना दिसत आहेत.जो सोबत येतील त्यांच्या सोबत ते जात आहेत. वंचित सोबतची युती सुद्धा त्यांनी घडवून आणली. उद्धव ठाकरे उघडपणे आपल्या भूमिका जनतेमध्ये घेऊन जात असताना शरद पवारांच्या भूमिका मात्र संभ्रम करून टाकणाऱ्या ठरू लागलेल्या आहेत.

एकंदरीत भाजपच्या विरोधात लढत असताना मात्र शरद पवारांची नागालँड मधील राजकीय भूमिका भाजप सोबत दोस्तीचाच तोहफा देत बसली आहे.महाराष्ट्रात कुस्ती आणि नागालँड मध्ये मात्र दोस्तीचे राजकारण शरद पवार यांच्या कडून केले जात आहे. भाजप मुळे जर देशात हुकूमशाही निर्माण झाली आहे, असे इथल्या राष्ट्रवादी सह इतर पक्षांना वाटत असेल तर विरोधकांची एकजुट का दिसत नाही ? परिस्थिती व सोई नुसार प्रत्येक पक्ष आपली राजकीय गणित मांडत बसणार असेल तर ह्या भूमिका फक्त स्वार्थाचे राजकारण घडवून आणेल. वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांच्या वर तर निवडणुकीच्या काळात भाजपची बी टीम म्हणून जसे आरोप केले जात होते त्यात आरोप करणारी राष्ट्रवादी सुद्धा होतीच. आज शरद पवारांच्या अशा भूमिकांमुळे तसेच पहाटेच्या शपथ विधी मुळे राष्ट्रवादीला भाजप सोबत का जोडले जाऊ शकत नाही ? घेतल्या जात असलेल्या भूमिका आणि त्या भूमिकाचे देण्यात आलेले स्पष्टीकरण जनतेत स्पष्टपणे नसल्याने राष्ट्रवादीच्या शरद पवारांचे राजकारण हे पुढील राजकीय घडामोडी घडेपर्यंत संशयाचे दार ठोठावत राहील राजकारणात कोणीच कोणाचा कायमस्वरूपी मित्र आणि शत्रू नसतो. हे मान्य आहे. त्यामुळे अशा खटकणाऱ्या भूमिका सुद्धा नेहमीच लोकांना चर्चेचे गुराळ बनत तर राहतील अन लोकांना जे अर्थ लावायचे आहेत ते लावत सुद्धा राहतीलच..

# 'विविध खेळांची माहिती'

आधुनिक केसरी

**विविध खेळाविषयी माहितीपूर्ण पुस्तकं येणे ही एक अतिशय आनंदाची बाब आहे. संतोष मिसाळ यांनी लिहलेलं पुस्तकं "विविध खेळांची माहिती "या पुस्तकात खेळा विषयी माहिती पूर्ण लेख आहेत ते लेख लेखकांनी आपल्या अनुभवाचे आधारे लिहले आहे. संतोष मिसाळ हे एक उत्कृष्ट शारीरिक शिक्षण शिक्षक विविध खेळामध्ये गोल्ड मेडल प्राप्त आहेत. ते स्वतः मल्लखांब चे उत्कृष्ट खेळाडू व भारतातून सुवर्णपदक प्राप्त असून विद्यापीठाच्या मलखामच्या चमू मध्ये त्यांची टीम नायक म्हणून निवड झाली होती. त्यांनी मलखांमध्ये अनेक खेळाडू तयार केले. खेळांप्रमाणेच संतोष मिसाळ यांना सामाजिक कार्याची आवड आहे. त्यांनी काही गावांमध्ये वाचनालय सुरू केले. लोकांनी वाचन करून ज्ञानसंपन्न व्हावे ही त्यांची धडपड आहे. संतोष मिसाळ हे एक उपक्रमशील व्यक्तिमत्व आहे.**

खेळ हा मानवी जीवनाला अत्यंत आवश्यक आहे. खेळामुळे अनेक फायदे होतात. या पुस्तकात संतोष मिसाळ यांनी विविध खेळांची माहिती दिली आहे. त्याचप्रमाणे खेळ व व्यायाम हे मानवी जीवनाला कसे आवश्यक असून मानवी जीवन प्रगतिशील करणारे आहेत त्याचे विवेचन या पुस्तकात आले आहे. विदेशी खेळांबरोबरच त्यांनी या पुस्तकात देशी खेळाबद्दल माहिती दिली आहे. त्याचप्रमाणे खेळाच्या द्वारे विद्यार्थी आपले करियर कसे घडवू शकतात तेही सांगितले आहे.या पुस्तकात कबड्डी, खो-खो, क्रिकेट आधी खेळांबद्दल सविस्तर माहिती आली आहे. संतोष मिसाळ यांनी खेळाबद्दल योग्य माहिती दिली आहे. त्या खेळाचा इतिहास, त्या खेळाचा विकास, खेळाची सद्य स्थिती अशा प्रकारची माहिती या पुस्तकात आली आहे. त्यामुळे हे पुस्तक वाचनीय झाले आहे. संतोष मिसळ यांचे हे क्रीडा विषयक लेखन अभ्यासपूर्ण आहे. प्रत्येक खेळाची चांगली माहिती मिळवून त्याची योग्य मांडणी केली आहे. या पुस्तकातून खेळाबद्दल सुलभ रीतीने आपणास माहिती प्राप्त होते. केवळ खेळाबद्दल ची माहिती या पुस्तकातून मिळते असे नाही तर मानवी जीवनाला खेळ कसे आवश्यक आहेत तेही कळते व यातून खेळ खेळण्याची प्रेरणा मिळते. आजच्या काळात अनेक पुस्तके प्रकाशित होत आहेत पण त्यात खेळासंबंधी कमी पुस्तके असतात. हे पुस्तक खेळाच्या माध्यमातून मानवी जीवनाला योग्य दिशा देणारे पुस्तक झाले आहे .विविध खेळांची सविस्तर माहिती या पुस्तकातून मिळते त्यामुळे वाचणाऱ्याच्या सामान्य ज्ञानात भर पडते. विविध खेळाचे ज्ञान वाचकांना होते. संतोष मिसाळ यांची लेखन शैली उत्तम आहे साध्या सरळ भाषेत त्यांनी खेळाबद्दलची उत्कृष्ट माहिती दिलेली आहे. हे पुस्तक वाचनीय झाले आहे. ते वाचताना कंटाळा येत नाही .खेळ सर्वांनाच प्रिय असल्यामुळे आपल्या आवडीच्या खेळाची माहिती या पुस्तकातून जाणून घेता येते. खेळ खेळाडू यांच्या बद्दल कमी पुस्तके प्रकाशित होतात म्हणून या पुस्तकाचे महत्त्व मोठे आहे. शरीर संपदा ही सर्वात महत्त्वाची असते खेळ शरीर संपदा वाढवण्यासाठी मदत करतात



त्यामुळे खेळाचे महत्व मोठे आहे.योगासह विविध खेळांची माहिती या पुस्तकात आल्यामुळे हे पुस्तक संग्रहणीय झाले आहे. कुस्ती मल्लखांब या खेळाबद्दल ची माहिती सखोल आहे .लेखक स्वतः मलखांब चे उत्कृष्ट खेळाडू असल्यामुळे या लेखनात वास्तवता व वस्तुनिष्ठता आली आहे. विटी दांडू ,लगोरी अशा खेळांची माहिती सुद्धा महत्त्वपूर्ण आहे. क्रिकेटचा इतिहास या पुस्तकात दिला गेला आहे तो रंजक व उद्‌बोधक आहे. क्रिकेट प्रमाणेच इतर खेळांचा इतिहास त्याचा विकास थोडक्यात मांडला आहे फ्लॉवर बॉल यासारख्या लोकांना फारशा परिचित नसलेल्या खेळाची विस्तृत माहिती या पुस्तकात आली आहे. माणसाच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी योग फार महत्त्वाचा आहे योगा बद्दलची सविस्तर माहिती यात आली आहे ती उपयुक्त व महत्त्वाचे आहे. एकंदरीतच हे पुस्तक खेळाची आवड असणाऱ्यांसाठी व खेळाची आवड नसणाऱ्यांसाठीही उपयुक्त माहिती देणारे उत्तम पुस्तक झाले आहे .एका अधिकारी शारीरिक शिक्षकाने ते लिहिले असल्यामुळे पुस्तकाला विशेष मूल्य प्राप्त झाले आहे .श्री संतोष मिसाळ यांनी परिश्रमपूर्वक या पुस्तकाचे लेखन केले आहे .त्याबद्दल त्यांना धन्यवाद. त्यांच्या हातून अशीच क्रीडा सेवा व साहित्य सेवा होत राहो ही सदिच्छा त्यांनी एका चांगल्या पुस्तकाची निर्मिती केल्याबद्दल धन्यवाद पात्र आहेत. पुढच्यालेखनासाठी त्यांना शुभेच्छा.

**प्रकाशक :- साहित्य साधना प्रकाशन, दर्यापूर**
**किंमत :- 100**
**पृष्ठ :- 80**

**समीक्षक**
**बबलू कराळे (स. शिक्षक )**
**अवधूत नागर "जान्हवी निवास " दर्यापूर, जिल्हा :-अमरावती, मो. 7218029838**

# मातंग समाजात आर्थिक साक्षरता कधी येईल ?

आधुनिक केसरी

नुकतेच 31 मार्च रोजी आर्थिक वर्षे संपले आणि अनेक बँका, पतसंस्था, सहकारी सोसायट्या, तसेच विविध संस्थांनी आपले ताळेबंद सादर केले डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या प्रॉब्लेम ऑफ रुपीज" या प्रबंधाच्या आधारे देशाने रिझर्व्ह बँकेची स्थापना केली आणि देशाची आर्थिक उलाढाल या बँकेच्या नियमावलीने सुरू झाली. तसेच आमच्या अहमदनगर जिल्ह्यात सहकार रुजला वाढला आणि देशभर त्याची पाळेमुळे घट्ट रोवून आज फोवताना दिसत आहे. सहकाराच्या माध्यमातून एकत्र येऊन अनेक बँका, पतसंस्था आणि कारखाने उभे राहिले त्यातून अनेक कुटुंबे आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली नुसतीच सक्षम झाली नाही तर आर्थिक ताकदीने राजकीय ताकद निर्माण करून राज्यकर्ते होऊन राज्य चालवीत आहे. मातंग समाज तसा आर्थिक दृष्ट्या पहिल्या पासून दुर्बल आणि त्यामुळेच राजकीय दृष्टया दुर्लक्षित असाच असल्याचे दिसून येते. मातंग समाजाच्या आर्थिक उन्नती साठी लोक शाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले मात्र त्यातून चाळीस वर्षात किती उद्योजक निर्माण झाले व ते का झाले नाही हा संशोधनाचा विषय आहे



आपण एकमेकावर विश्वास ठेवायला तयार नाही. मग ते राजकीय असो की सामाजिक क्षेत्र त्यातून प्रगती दिसली नाही. मागील काही दिवसांपूर्वी बचत गट चळवळ उभी राहिली,मात्र ती देखील आपल्या समाजात रुजली नाही. आजही प्रत्येक तालुक्यात किमान शंभर दोनशे नोकरदार आहेत पण त्यांचा आर्थिक प्रश्न सुटल्याने त्यांना या विषयात पाहिजे तेवढा इंटरेस्ट दिसत नाही दुसऱ्या बाजूला दोन वेळच्या पोटासाठी काबाडकष्ट करणारा वर्ग आहे मात्र या साऱ्यातून एकत्र येऊन आर्थिक सक्षमीकरण करण्यावर काम करायला कोणी तयार नाही आणि कोणी तयार झालाच तर त्याच्यावर विश्वास ठेवायला लोक तयार होत नाही. जर समाजातील काही लोक एकत्र येऊन या विषयावर काम केले तर आणि तरच या विषयात वाटचाल करता येईल. आणि त्यातून आर्थिक विकासा बरोबरच राजकीय ध्येय साध्य करता येऊ शकते मात्र आपले अनेक नेते प्रस्तापित राजकीय नेत्यांच्या सोबत काम करून देखील त्यांच्या आर्थिक सक्षमीकरण या विषयाचा अभ्यास करताना दिसत नाही त्यामुळेच आमचा ताळेबंद मांडता येत नाही तर समाजात अनेक हुशार व तज्ञ व्यक्तींची कमी नाहीच.

**ॲड.नितीन पोळ, लोक स्वराज्य आंदोलन**
**9860733420, 9175894420**

# वैजापुरातील विविध रस्त्यांचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** शहराच्या वैभवात भर टाकणारे टिळक पथ, शिवाजी पथ, गुजराथी गल्ली व जुना स्टेट बँक रस्ता या सर्व रस्त्यांचे किंक्रेटिकरण विद्यमान मुख्यमंत्री ना,एकनाथरावजी शिंदे यांनी शहराच्या विकासासाठी दिलेल्या६५कोटी रुपयांच्या निधीतून झाले असून हे सर्व रस्ते गुरुवार( ता. ६ )रोजी खुले करण्यात आले. आ. रमेश पा.बोरनारे, नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, उपनगराध्यक्ष साबेरखान, उपविभागीय पोलीस अधिकारी महक स्वामी, मुख्यअधिकारी भागवत बिघोत, बाबासाहेब जगताप, राजेंद्र पा. साळुंके, पारस घाटे, नगरसेवक, न.प.चे कर्मचारी, महावितरण चे इंजिनिअर श्री. जयंते, व्यापारी संघाचे काशिनाथ गायकवाड, प्रकाश बोथरा,व गौरव दौडे, धोंडीराम ठाकूर,यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आले, याप्रसंगी आ. बोरनारे म्हणाले की, शहराच्या आणखी विकासासाठी दहा कोटी रुपये मा. मुख्यमंत्री यांच्या निधीतून मिळणार असून शहरातील धार्मिक स्थळे, सभा मंडप, श्री छत्रपती शिवाजी महाराज मंगल कार्यालय, रामराव नाना पाटील सांस्कृतिक सभागृह इत्यादी वास्तू साठी ते वापरुन नागरीकांच्या सेवेत अर्पण करण्यात येतील, नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी, उपनगराध्यक्ष साबेरखान यांची भाषणे झाली, युवा समाजसेवक गौरव दौडे यांनी व त्यांच्या सर्व सहकारी वर्गाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात पुढाकार घेतला, गौरव दौडे यांचे सहकारी नंदू शेठ लोढा, मनोज संचेती, मनोज दौडे, मुकुंद दाभाडे, कैलास साखरे, महेंद्र काटकर, इस्माईल पटेल, सतीश वर्मा, निलेश पारख, फिरोज हिंगोरा, अशोक धसे, सोनू राजपूत, जवाहर कोठारी, काशिनाथ भवसार, महेश राऊत यांनी उपस्थितांचे स्वागत केले. गौरव दौडे यांनी प्रास्ताविक केले.

# गौणखनिजाचे जप्त केलेले दोन हायवा ट्रक पळवून नेले

## टोळक्याविरूध्द गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** अवैधरित्या गौणखनिजाची ( मुरूम ) वाहतूक करणारे दोन हायवा ट्रक महसूल विभागाच्या पथकाने कारवाई करून जप्त केले होते. महसूलच्या पथकाने जप्त करून ठेवलेले १० लाख रूपये किंमतीचे दोन्ही हायवा ट्रक आणि ९ हजार ६०० रूपये किंमतीचा ८ ब्रास मुरूम टोळक्याने तहसील कार्यालयाच्या आवारातून बनावट चावीच्या सहाय्याने पळवून नेल्याची घटना २२ मार्च रोजी घडली.

अवैधरित्या गौणखनिजाची ( मुरूम ) वाहतूक करणारे दोन हायवा ट्रक महसूल विभागाच्या पथकाने कारवाई करून जप्त केले होते. महसूल विभागाने जप्त केलेल्या दोन्ही ट्रकमध्ये जवळपास ९ हजार ६०० रूपये किंमतीचा ८ ब्रास मुरूम होता. २२ मार्च रोजी सोहेल शेख, शेख फेरोज व त्यांच्या चार साथीदारांनी तहसील कार्यालयाच्या आवारात उभे केलेले दोन्ही हायवा ट्रक बनावट चावीच्या सहाय्याने पळवून नेले. याप्रकरणी चौक्याचे मंडळ अधिकारी सुंदरराव लक्ष्मण काळे ( वय ५२,रा.माणिकनगर, गारखेडा ) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हायवा ट्रक पळवून नेणाऱ्या टोळीविरूध्द सिटीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळा सुशोभिकरणाचा लोकार्पण सोहळा



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील कोर्टाजवळील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याच्या सुशोभीकरणाचा विषय कित्येक वर्षांपासून प्रलंबित होता. त्यासाठी काही महिन्यापूर्वी आंदोलन करण्यात आली होती त्या आंदोलनाच्या बातम्या सर्व वृत्तपत्र बातमी न्यूज चैनल येथे झळकल्या अशाच प्रकारे धुळे शहराचे आमदार फारूक शाह त्यांनी त्या बातम्या पहिल्या व आंदोलनाची दखल घेऊन तात्काळ महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याजवळील सुशोभीकरणाचा मुद्दा हाती घेतला व तो पूर्णही केला. त्या सुशोभीकरणाचा लोकार्पण सोहळा करण्यात आला.ह्या कामाची दखल घेतल्याने शहरातील माळी समाजातर्फे व कित्येक सामाजिक कार्यकर्त्यांतर्फे त्यांचा सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले त्या ठिकाणी आ.फारुख शाह, पोलीस अधीक्षक बारकुंड साहेब, हिलाल अण्णा माळी, डॉ. सुशील महाजन, हनुमंत आप्पा वाडीले,गुलाब माळी, डॉ. दिपश्रि नाईक, कॉ.राव, बी.बी.महाजन, साबीर सय्यद, गनी डॉलर,देवेंद्र पाटील, बी.एन.बिरारी, आसाराम माळी, प्रकाश चौधरी, ईश्वर परदेशी,उमेश पाटील, एड.चंद्रकांत येशिराव, हरिश्चंद्र लोंढे,एड. महाजन, ज्ञानेश्वर माळी, दिलीप आप्पा देवरे इत्यादी उपस्थित होते.






# मेळाव्यासाठी राजपूत समाज एकवटला

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येत्या ३० एप्रिल,२०२३ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित महाराजपूत मेळाव्यासाठी वैजापूर तालुक्यातील संजरपूरवाडी येथे शुक्रवार( ता. ०७ )रोजी राजपूत/ परदेशी समाजाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत राजपूत महामेळाव्यासाठी हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचा संकल्प जमलेल्या राजपूत बांधवांनी केला. संभाजीनगर येथून डॉ. जीवन राजपूत, महिपालसिंह चांदा, वैजापूर येथून सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी महामेळाव्याचा उद्धेश सांगून या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन केले. या प्रसंगी वैजापूर येथून सुभाष गोमलादु, पारस बहुरे, संतोष गोमलाडू यांची प्रमुख उपस्थिती होती. संजरपूरवाडी चे सरपंच राजुसिंह जारवाल, उपसरपंच राजू बहुरे तसेच संतोष बैनाडे, मंगलसिंह सिंगल, रणजित सिंह राजपूत यांनी सहभाग नोंदविला.

संजरपूरवाडी येथे राजपूत समाजाची पांचसे घरे असून येथील प्रत्येक कुटुंबातील सर्व सदस्य ३० एप्रिलच्या राजपूत मेळाव्यासाठी उपस्थित राहण्याचा संकल्प या प्रसंगी उपस्थितीनी संकल्प केला. माजी सरपंच त्रिंबकसिंह जारवाल,सांडू बमनावत, सोसायटी चेअरमन नरसिंह जारवाल, पो.पा. रामचंद्र गोमलाडू,घनश्याम नायमाने, जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत सावळदबारा,प्रताप गोमलाडू व समस्त राजपुत समाज गावकरी या प्रसंगी उपस्थित होते.






# चिमुकल्या 'विष्णू 'च्या मदतीला धावून आले गुरुजन

## जिनियस मास्टर्स फाउंडेशनची ५० हजारांची मदत : माणुसकीचे घडले दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जामनेर तालुक्यातील पहूर येथे झाडाची फांदी डोक्यावर पडून गंभीररित्या जखमी होऊन कोमात गेलेल्या हिवरखेडा (ता. जामनेर) येथील चिमुकल्या 'विष्णू'वर जळगाव येथे अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून त्याच्या वैद्यकीय मदतीसाठी जामनेर येथील जीनियस मास्टर्स फाउंडेशन धावून आले आहे. पन्नास हजारांची मदत करून गुरुजनांनी खऱ्या अर्थाने माणूसकीचे दर्शन घडविले आहे. पहूर येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात शिकणारा विष्णू गणेश कुमावत या विद्यार्थ्याच्या डोक्यावर पिंपळाच्या झाडाची फांदी पडल्याने शनिवारपासून त्याच्यावर जळगाव येथे डॉ. डाबी यांच्या दवाखान्यात उपचार सुरू असून तो मृत्यूशी झुंज देत आहे. घरची परिस्थिती हालाखीची असल्याने शाळेतील विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही मदतीचा हात पुढे केला आहे. त्याचबरोबर आज गुरुवारी जामनेर येथील जीनियस मास्टर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष रमेश पाटील यांच्या सह पदाधिकाऱ्यांनी नगरपालिका गटनेते डॉ. प्रशांत भोंडे, नगर सेवक सुहास पाटील, पंचायत समिती गटनेते अमर पाटील यांच्या सहकार्याने फाउंडेशनच्या व्हाट्सअप ग्रुपवर मदतीचे आवाहन करताच गुरुजनांचे मदतीचे हात पुढे सरसावले. दोनच दिवसात पन्नास हजार रुपयांचा मदत निधी संकलित करून आज हिवरखेडा येथील ग्रामस्थ बाळकृष्ण पाटील, बाळू पाटील, महेश पाटील, भास्कर पाटील यांच्या स्वाधीन केला. सचिव नामदेव पाटोळे, उपाध्यक्ष जनार्धन लोखंडे, किशोर काळे, श्रीकांत पाटील, संदीप पाटील, राहुल महाजन, किशोर पाटील, विलास भुसारी ,स्वप्निल कासार यांच्यासह शिक्षकांनी मदतीसाठी आवाहन केले.

**विद्यार्थ्यांनी केली प्रार्थना :** सावित्रीबाई फुले विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आज शालेय परिपाठात विष्णूच्या उदंड दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली . दवा आणि दुवा दोघेही कामी येतील असा आशावाद मुख्याध्यापिका व्ही . व्ही .घोंगडे यांनी व्यक्त केला . समाजाचा आपण एक देणं लागतो या कृतार्थ भावनेतून जीनियस मास्टर फाउंडेशन कार्यरत आहे . चिमुकल्या विष्णूच्या वैद्यकिय उपचारासाठी गुरुजनांनी मदत केली . अशा संकट काळी सर्वांनी पुढे येणे हाच खरा माणुसकी धर्म आहे .

**रमेश पाटील, संस्थापक अध्यक्ष, जीनियस मास्टर्स फाउंडेशन , जामनेर**

# सावळदबारा परिसरात भाजपा स्थापना दिन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा येथे दि.६ रोजी दिन सावळदबारा परिसरात मोठ्या उत्साहात साजरा झाला. भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी भाजपा कार्यकर्त्यांना दिलेल्या संदेशाचे लाईव्ह प्रक्षेपण दाखविण्यात आले.या भाजपा स्थापना दिनानिमित्त, सोयगाव तालुका, फर्दापूर सर्कल मध्ये विविध बूथ वर ध्वजारोहण तालुका अध्यक्ष गणेश लोखंडे यांच्या हस्ते संपन्न झाले.तर पंडित दीनदयाळ उपाध्याय व शामा प्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेस शांताराम खराटे अनुसूचित जाती अध्यक्ष सोयगाव यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.भाजपा 43 वा स्थापना दिवस मोठा आनंदात साजरा केला यावेळी जेष्ठ नागरिक व करकर्त्यांचा सत्कार करण्यात आला, युवकांचा भाजपामध्ये प्रवेश करून घेतला तसेच बुथप्रमुख व पदाधिकारी यांच्या मोबाईल मध्ये सरल ॲप डाउनलोड करून माहिती भरून घेतली तसेच सर्कलमध्ये पाच ठिकाणी भिंती रंगवून कमळ चिन्ह व एक बार फिरसे मोदी सरकार घोषणा लिहिल्या या प्रसंगी, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण, प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम चव्हाण, शिवा मानकर, भाजपा SC मोर्चा ता अध्यक्ष-शांताराम खराटे,भाजयुमो ता चिटणीस ईश्वर कोळपे, Obc मोर्चा ता चिटणीस दीपक मानकर, राजू खराटे, पप्पू टिकारे, सुनील शिप्पलकर, विविध बुथवरील बुथप्रमुख, पेजप्रमुख, भाजपा कायकर्ते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.









